# महाराष्ट्र विधानपरिषद

## दुसरे अधिवेशन, २०२५

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**गुरुवार, दिनांक १७ जुलै, २०२५ / आषाढ २६, १९४७ (शके)**

**(१) उप मुख्यमंत्री**
**(२) अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री**
**(३) सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री**
**(४) अन्न व औषध प्रशासन, विशेष सहाय्य मंत्री**
**} यांचे प्रभारी विभाग**

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ३६**

---

### मिठी नदीतील गाळ उपसा करण्याच्या कामामध्ये अनियमितता झाल्याबाबत

**(१) * २७५२ श्री.प्रसाद लाड, श्री.प्रविण दरेकर, श्रीमती उमा खापरे, श्रीमती चित्रा वाघ, ॲड.निरंजन डावखरे, श्री.राजहंस सिंह, श्री.सचिन अहिर, श्री.सुनिल शिंदे, श्री.शशिकांत शिंदे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून मुंबईतील मिठी नदीतून २ लाख १४ हजार ३१५ मेट्रिक टन गाळ काढण्याचे उद्दिष्ट ठरविण्यात आले असतानाही आजमितिपर्यंत केवळ १ लाख १३ हजार ८४३ मेट्रिक टन गाळ काढण्यात आला असून, सदर गाळ कंत्राटदाराने मुख्य रस्त्यालगत आणि मेट्रो स्थानकाजवळ तसेच नदी काठावर टाकला असल्याने सद्य:स्थितीत प्रवाशांना त्रासाला सामोरे जावे लागत असल्याची बाब दिनांक २८ मे, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मिठी नदीतील गाळ उपसण्यात सुमारे रुपये १००० कोटी एवढ्या रक्कमेच्या गैरव्यवहाराप्रकरणी कंत्राटदार, महानगरपालिका अधिकारी, दलाल, खासगी कंपनी अधिकारी यांचेविरूध्द गुन्हे दाखल झाल्याची माहिती निदर्शनास आली असून, प्रस्तुत प्रकरणी झालेल्या गैरव्यवहाराची व्याप्ती लक्षात घेता पुढील तपास वा सखोल चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी उघड झालेल्या गैरव्यवहाराची रक्कम शासनातर्फे कशाप्रकारे वसूल करण्यात येणार आहे तसेच गेली कित्येक वर्षे प्रलंबित असलेले मिठी गाळ उपसा प्रकरण मार्गी लावण्याकरीता शासनातर्फे समिती नेमून मिठी नदीमध्ये दरवर्षी साठणाऱ्या गाळाचा प्रश्न निकाली काढण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, मिठी नदीतील गाळ काढण्याच्या कामांमध्ये अनियमितता दिसून आल्याने मा.मुख्यमंत्री महोदयांच्या निदेशानुसार आर्थिक गुन्हे शाखा विभागाने सन २००६ पासून ते सन २०२३-२४ या कालावधीमध्ये ज्या ५१ कंत्राटदार कंपन्यानी गाळ उपसण्याचे काम केले आहे त्या कंपन्यांचे पत्ते व संचालकांची माहिती महानगरपालिकेच्या पर्जन्य जल अभियंता यांच्याकडून मागितली असल्याची बाब माहे एप्रिल, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर माहिती आर्थिक गुन्हे विभागाकडे लवकरात लवकर सादर करण्याबाबत महानगरपालिकेकडून कोणती कार्यवाही करण्यात आली आहे, उक्त माहिती देण्यास दिरंगाई करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली व सदर माहिती केव्हापर्यंत देणे अपेक्षित आहे,
(६) असल्यास, मुंबईतील मिठी नदीतील गाळ न उपसताच रुपये ४५ कोटी एवढ्या रकमेचे देयक मंजूर करुन अनियमितता केल्याबाबत चौकशी करण्याकरीता विशेष तपास पथक (एसआयटी) नेमण्यात आले आहे काय, मिठी नदीचा गाळ काढण्याच्या प्रकल्पातील कथित अनियमितता आणि निधीच्या कथित गैरवापराबाबत विशेष तपास पथकामार्फत प्राथमिक चौकशी पूर्ण झाली आहे काय, यात कोणकोणते अधिकारी व कंत्राटदार सामील आहेत त्याची नांवे काय आहेत,
(७) असल्यास, यामध्ये दोषी आढळून आलेल्या कंत्राटदार तसेच संबंधित अधिकाऱ्यांविरुध्द शासनाने कोणती कठोर कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) मिठी नदीतील गाळ काढल्यानंतर कंत्राटदारामार्फत नदी लगतच्या सेवा रस्त्यावर काढण्यात येतो व निविदेतील अटी व शर्तींनुसार ४८ तासाच्या आत उचलून कंत्राटदाराने कंत्राटातील तरतूदीनुसार उपलब्ध करुन दिलेल्या खाजगी क्षेपणभूमीवर टाकण्यात येतो.
(२) व (३) मिठी नदीच्या पुनर्जिवितेसंदर्भात सन २००५-२०२३ या कालावधीकरीता केलेल्या कामाच्या अनुषंगाने दिनांक २० मार्च,२०२४ रोजीच्या आदेशान्वये पोलीस सह आयुक्त (आर्थिक गुन्हे विभाग, मुंबई) यांच्या मार्गदर्शनाखाली व पोलीस उप आयुक्त, गुन्हे विभाग यांच्या थेट पर्यवेक्षणाखाली ३ वरिष्ठ अधिकाऱ्यांचे विशेष चौकशी पथक (SIT) गठीत करण्यात आले. आर्थिक गुन्हे विभागाने दिलेल्या अहवालानुसार रुपये ६५ कोटीं इतक्या रकमेच्या गैरव्यवहाराबाबत आझाद मैदान पोलीस ठाणे, मुंबई येथे गुन्हा नोंद क्र.७५/२०२५, कलम ४०६,४०९,४२०,४६५,४६७,४६८,४७१ व १२० (ब) प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर गुन्हा आर्थिक गुन्हे विभाग, मुंबई यांचेकडे तपासाधीन आहे.
(४) व (५) आर्थिक गुन्हे शाखेच्या दिनांक २३ एप्रिल, २०२५ रोजीच्या पत्रास अनुसरून सन २००६ ते २०२३ या कालावधीत मिठी नदी संबंधित कामे दिलेल्या कंत्राटदार कंपन्यांची यादी बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून दिनांक ०२ मे, २०२५ रोजीच्या पत्रान्वये पाठविण्यात आली आहे.
(६) व (७) मुंबईतील मिठी नदीतील गाळ उपसामध्ये रक्कम रुपये ६५ कोटीच्या घोटाळयाबाबत विशेष तपास पथकाव्दारे चौकशी करण्यात आली. चौकशीअंती गुन्हयामध्ये सामील असलेले खालील अधिकारी व कंत्राटदार यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

१) केतन अरुण कदम, २) जय अशोक जोशी, ३) प्रशांत रामुगडे, सहाय्यक अभियंता तथा पदनिर्देशित अधिकारी, ४) प्रशांत गणेश बेंद्रे,उप प्रमुख अभियंता ५) प्रशांत तायशेट्टे, उप प्रमुख अभियंता ६) मॅटप्रॉप स्पेशालीटीज प्रा.लि. चे दिपक मोहन, ७) मॅटप्रॉप स्पेशालीटीज प्रा.लि. चे किशोर मेनन, ८) भुपेंद्र पुरोहित, ९) ॲक्युट डिझाईन्स, १०) कैलास कंन्स्ट्रक्शनस,११) एन.ए.कंन्स्ट्रक्शनस, १२) निखील कंन्स्ट्रक्शनस कंपनी, १३) जे.आर.एस. ईन्फ्रास्ट्रक्चर

----------------

## राज्यात गुटखा बंदी योजनेची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याबाबत

**(२) * ३१८१ श्री.श्रीकांत भारतीय, श्री.दादाराव केचे, श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गुटखा व पान मसाल्यामुळे कर्करोगासारखा होणारा जीवघेणा आजार व कुटुंबांची होणारी वाताहत लक्षात घेता सन २०१२ पासून राज्यात गुटखा, पान मसाल्याच्या उत्पादन, विक्री आणि वितरणावर बंदी घालण्यात आली असतानाही आजही गुटखा व पान मसालाजन्य पदार्थांची सर्रास विक्री होत असल्याची बाब माहे एप्रिल, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यामध्ये दररोज रुपये १०० कोटींचा गुटखा हा इतर राज्यांमधून अवैध मार्गाने आणला जात असून सदर तस्करीमध्ये राज्यातील काही अधिकाऱ्यांचाही समावेश असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पाचोरा (जि.जळगाव) शहरातून रुपये २२ लाख ५० हजार एवढ्या किंमतीचा गुटखा व पान मसाला जप्त केल्याची बाब दिनांक १ एप्रिल, २०२५ रोजी निदर्शनास आली असून सदर प्रकरणी शासनाने संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली आहे,

(४) असल्यास, राज्यात सार्वजनिक ठिकाणी दारू पिणाऱ्यांवर कारवाई करण्यात येते त्याचप्रमाणे गुटखा बंदीची अंमलबजावणी होण्याकरीता गुटखा, पानमसालाजन्य पदार्थांची विक्री, सेवन करणाऱ्यांवर तसेच संबंधित प्रकरणी जबाबदार असणाऱ्या दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) असल्यास, राज्यातील सीमा तपासणी नाक्यावरील दुर्लक्षामुळे राज्यात परराज्यातून गुटख्याची सर्रास वाहतूक व नंतर विक्री होत असल्याने राज्यातील सीमा तपासणी नाक्यावरील तपासणी अधिक कठोर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.नरहरी झिरवाळ :** (१) गुटखा व पान मसालाजन्य पदार्थांची सर्रास विक्री होत असल्याची बाब निदर्शनास आली नाही. तथापि, अन्न व औषध प्रशासनाने माहे ०१ एप्रिल, २०२५ ते ३१ मे २०२५ या कालावधीत एकूण ५३ प्रकरणांमध्ये रुपये ३,२०,९६,३७७/- इतक्या किमतीचा गुटखा व तत्सम पदार्थाचा साठा जप्त केला असून एकूण १० वाहने जप्त केली आहे. तसेच, सर्व प्रकरणी प्रथम खबरी अहवाल नोंदविण्यात आले आहे.

(२) दररोज रुपये १०० कोटींचा गुटखा इतर राज्यांमधून अवैध मार्गाने आणला जात असल्याची बाब निदर्शनास आली नाही.

स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखा, सांगली यांनी दिनांक ३०/०४/२०२३ रोजी नागज फाटा, ता.कवठेमहाकाळ, जिल्हा सांगली येथे प्रतिबंधित अन्नपदार्थाच्या प्रकरणामध्ये तपास करून एकूण ०९ जणांविरुध्द मा.प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी यांचे न्यायालयात खटला क्र. १३६/२०२३ दाखल केला असून सदर खटल्यात तत्कालीन अन्न सुरक्षा अधिकारी, सोलापूर यांना सह आरोपी करण्यात आले आहे. तथापि, मा.उच्च न्यायालयाने फौजदारी रिट याचिका क्र.१२७३/२०२४ मध्ये दिनांक ०३/१०/२०२४ रोजी आदेश पारीत करून उपरोक्त प्रकरणी स्थगिती दिली आहे.

(३) हे खरे आहे.

पाचोरा पोलीस ठाणे, जळगांव यांनी दिनांक ०१/०४/२०२५ रोजी प्रतिबंधीत अन्नपदार्थाच्या अनुषंगाने कारवाई करून एकूण रुपये २२,५४,०००/- किमतीचा साठा जप्त केला. तसेच, वाहतुकीसाठी वापरण्यात आलेले वाहन जप्त करून संबंधित वाहन चालकाविरुध्द पाचोरा पोलीस ठाणे, जळगांव येथे प्रथम खबरी अहवाल क्र. १६४/२०२५ दाखल करण्यात आला आहे.

(४) अन्न व औषध प्रशासनाने माहे ०१ एप्रिल, २०२४ ते ३१ मार्च २०२५ या कालावधीत ४४९ आस्थापनांची तपासणी केल्या. त्यापैकी ४१५ आस्थापनांमध्ये रुपये ६३,२३,९६,२३५/- इतक्या किमतीचा प्रतिबंधित अन्नपदार्थांचा साठा जप्त केला असून एकूण १२७ वाहने जप्त केली आहे. तसेच, सर्व प्रकरणी प्रथम खबरी अहवाल नोंदविण्यात आले आहे.

(५) प्रतिबंधित अन्न पदार्थांची वाहनातून वाहतूक होत असल्यास व साठा करुन ठेवला असल्यास त्याचा प्रतिबंधित अन्न पदार्थांच्या वाहतूकीसाठी व साठवणूकीसाठी पुर्नवापर न होण्याकरीता सदर वाहन जप्त करण्यात यावे. तसेच, सदर जागा/गोदाम सील करण्याची कारवाई घेण्यात यावी असे निर्देश आयुक्त, अन्न व औषध प्रशासन यांनी दिनांक ०६/०४/२०१७ रोजीच्या ज्ञापनाव्दारे देण्यात आले आहे. तदनंतर दिनांक १२/०९/२०१८ रोजीच्या परिपत्रकाव्दारे गुटखा, पानमसाला व इतर तत्सम प्रतिबंधित अन्न पदार्थाची वाहतूक करणाऱ्या वाहनांचा वाहतूकीचा परवाना तसेच वाहन चालकाचा परवाना रद्द करणेबाबत संबंधित प्रादेशिक परिवहन प्राधिकरणाला सूचित करण्याबाबतचे निर्देश देण्यात आले आहेत.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## संजय गांधी निराधार योजनेंतर्गत पात्र लाभार्थ्यांचे मानधन अदा करण्याबाबत

**(३) * ३१८९ श्री.राजेश राठोड :** सन्माननीय **विशेष सहाय्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाकडून संजय गांधी निराधार, विधवा अनुदान व अपंग अनुदान या तिन्ही योजनेंतर्गत पात्र लाभार्थ्यांना दरमाह मानधन प्रदान करण्यात येत असून मराठवाडा, विदर्भ, कोकण विभागातील अनेक गावांमधील लाभार्थ्यांना मागील पाच महिन्यांपासून मानधन मिळाले नसल्याची बाब माहे एप्रिल, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मराठवाडा, विदर्भ, कोकण विभागातील अनेक गावांमधील लाभार्थी तहसिल कार्यालयात मानधनासाठी सातत्याने पाठपुरावा करूनही कोणीही प्रतिसाद देत नसल्याने लाभार्थ्यांवर उपासमारीची वेळ आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मराठवाडा, विदर्भ, कोकण विभागातील अनेक गावांमधील लाभार्थ्यांना नियमित मानधन मिळण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली तसेच मानधन देण्यास विलंब करणाऱ्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.नरहरी झिरवाळ :** (१) विशेष सहाय्य योजनेतील पात्र लाभार्थ्यांना अर्थसहाय्याचे वितरण डी.बी.टी. द्वारे करण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे. ज्या लाभार्थ्यांचे आधार प्रमाणिकरण झालेले नाही, आधार बँकेशी लिंक झालेले नाही तसेच आधार अद्ययावत नाही अशा कारणास्तव काही लाभार्थ्यांना अर्थसहाय्य मिळाले नाही हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) विशेष सहाय्य योजनेतील पात्र लाभार्थ्यांना दरमहा देण्यात येणारे अर्थसहाय्य रुपये १५००/- माहे डिसेंबर, २०२४ पासून डी.बी.टी. पोर्टलद्वारे देण्यात येत आहे. माहे, जानेवारी, २०२५ पासून सदर योजनेतील केवळ आधार प्रमाणिकरण झालेल्या लाभार्थ्यांनाच डी.बी.टी. द्वारे अर्थसहाय्याचे वितरण त्यांच्या आधार संलग्न बँक खात्यात जमा करण्यात येत आहे. जुलै, २०२५ या महिन्याचे अर्थसहाय्य ४०,४८,९८८ इतक्या लाभार्थ्यांच्या बँक खात्यात दिनांक ०४/०७/२०२५ रोजी जमा करण्यात आले आहे.

ज्या लाभार्थ्यांना आधार कारणास्तव अर्थसहाय्य मिळालेले नाही अशा लाभार्थ्यांचे Aadhar अद्ययावत करणेबाबत तसेच त्यांचे बँक खाते आधारशी संलग्न करण्याबाबत जिल्हा/तालुका/मंडळस्तरावर युध्दपातळीवर विशेष मोहिम राबविण्याच्या सूचना सर्व जिल्हाधिकारी यांना दिलेल्या आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## म्हाडाच्या दक्षिण मुंबईतील ५० उपकरप्राप्त इमारतींचा पुनर्विकास करण्याबाबत

**(४) * २५६९ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.राजेश राठोड, श्री.अभिजित वंजारी, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सुधाकर अडबाले, श्री.जयंत आसगावकर, श्री.राजहंस सिंह, श्रीमती उमा खापरे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र गृहनिर्माण क्षेत्र प्राधिकरणाच्या (म्हाडाच्या) दक्षिण मुंबईतील ५० उपकर प्राप्त इमारती अतिधोकादायक स्थितीत असून, सदर इमारतीतील रहिवाशांना सुरक्षित इमारतींमध्ये स्थलांतरीत करणे आवश्यक असल्याची बाब माहे मार्च, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबईत १३ हजारांहून अधिक उपकर प्राप्त इमारतींची दुरवस्था झाली असून त्यांची दुरुस्ती होवू शकत नसल्यामुळे दुर्घटना होऊन जीवितहानी होण्याची शक्यता निर्माण झाल्याची बाब माहे एप्रिल, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, म्हाडामार्फत करीरोड (पश्चिम) येथे बांधण्यात आलेल्या बारा इमारतींच्या दुरुस्ती व डागडुजीकडे गत ४० वर्षात दुर्लक्ष झाले असल्याची बाब माहे मे, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन दिरंगाईस जबाबदार असणाऱ्या संबंधितांवर कोणती कारवाई केली तसेच मुंबईतील म्हाडाच्या दुरवस्था झालेल्या ५० उपकर प्राप्त इमारतींचा पुनर्विकास करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) व (२) मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाने केलेल्या पावसाळापूर्व सर्व्हेक्षणात मुंबई शहरातील एकूण ९६ इमारती अतिधोकादायक असल्याचे आढळून आले असून, या अतिधोकादायक इमारतींची यादी विविध वर्तमानपत्रातुन माहे मे २०२५ मध्ये प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदर ९६ अतिधोकादायक इमारतीत एकूण २५७७ भाडेकरु / रहिवाशी आहेत. भाडेकरू /

रहिवाशांची पर्याय व्यवस्था संक्रमण शिबिरात करण्याची कार्यवाही मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळामार्फत सुरू आहे.
(३) करीरोड परिसरात म्हाडाने पुनर्रचित केलेल्या एकूण २० पुनर्रचित इमारती अस्तित्वात आहेत. सदर इमारतींची संरचनात्मक दुरुस्ती मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळामार्फत वेळोवेळी करण्यात येते.
(४) मुंबई शहरातील धोकादायक, जुन्या व मोडकळीस आलेल्या उपकर प्राप्त इमारतींचा पुनर्विकास जलद गतीने होण्यासाठी म्हाडा अधिनियम, १९७६ मध्ये दिनांक ०२/१२/२०२२ रोजी नवीन कलम ७९ (अ) अंतर्भूत करण्यात आले आहे. त्यानुसार अतिधोकादायक ९६ इमारतींच्या मालक / रहिवाशी यांना पुनर्विकासाचा प्रस्ताव सादर करण्यासाठी नोटीस बजाविण्याची कार्यवाही मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळामार्फत सुरु आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्गाचे काम पूर्ण करण्याबाबत

**(५) * २८०३ अॅड.अनिल परब, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.अमोल मिटकरी, श्री.प्रसाद लाड, श्री.प्रविण दरेकर, श्रीमती उमा खापरे, श्रीमती चित्रा वाघ, अॅड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्गावरील कशेडी घाट रस्त्याला भोगाव जवळ पाच ते सहा मीटर अंतरापर्यंत मोठ्या प्रमाणात भेगा पडल्या असल्यामुळे पाणी गळती सुरु असून पावसाळ्यात रस्ता खचून जीवितहानी होण्याची शक्यता निर्माण झाली होती तसेच दोन्ही बोगदयातून पाणी झिरपत असल्याने वाहनचालकांना नाहक त्रास सहन करावा लागत असल्याची बाब माहे एप्रिल, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावरील पनवेल ते कासू व कासू ते इंदापूर या ४२.३० कि.मी. लांबीतील मोठे पूल /उड्डाणपूलांच्या कामांची तसेच इंदापूर व माणगांव बायपासच्या लांबीमधील मोऱ्याचे व पूलाचे प्रलंबित असलेल्या कामाची सद्य:स्थिती काय आहे, सदर काम पूर्ण होण्यासाठी किती कालावधी लागणार आहे,
(३) असल्यास, मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावर दिशादर्शक फलक बसविण्याचे काम कधीपर्यंत पूर्ण करण्यात येणार आहे, तसेच मुंबई-गोवा महामार्गाच्या कि.मी. ०/०० ते ८४/६०० या लांबीतील भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण यांचेकडून प्रगतीत असलेल्या कामांपैकी कासू ते इंदापूर या लांबीतील प्रलंबित असलेली ३३.३० कि.मी. कॉक्रीटीकरणाची भुयारी मार्गाची (VUP/PUP) कामे पूर्ण करण्याच्या कामाची सद्य: स्थिती काय आहे,
(४) असल्यास, मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गाचे चौपदरीकरणाचे गत अनेक वर्षांपासून सुरु असलेले काम अद्याप पूर्ण झाले नसून माहे मे, २०२५ अखेर उपरोक्त राष्ट्रीय महामार्गाच्या कामाची सद्यःस्थिती काय आहे, उपरोक्त महामार्ग पूर्ण करुन सक्षमपणे वाहतूकीसाठी खूला करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) असल्यास, कशेडी येथील दोन्ही बोगदयाच्या बांधकामाकरीता कोट्यवधी रकमेचा निधी खर्च बोगदयातून पाणी गळती होत असून, सदर पाणी गळती रोखण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली

आहे, तसेच सदर रस्त्याची तातडीने दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली तसेच मुंबई - गोवा राष्ट्रीय महामार्गाचे काम करणाऱ्या संबंधित कंत्राटदाराविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले :** (१) अंशत: खरे आहे.

मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्ग क्र. ६६ ची महाराष्ट्र राज्यातील एकूण लांबी ४७१.३० कि.मी. असून त्यापैकी कि.मी. ०/०० (पळस्पे) ते कि.मी. ८४/०० (इंदापूर) या लांबीतील चौपदरीकरणाचे काम भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण (NHAI) व कि.मी. ८४/०० (इंदापूर) ते कि.मी. ४७१/३० (पात्रादेवी) या लांबीतील चौपदरीकरणाचे काम सार्वजनिक बांधकाम विभागाच्या राष्ट्रीय महामार्ग विभागामार्फत प्रगतीपथावर आहे.

मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्ग क्र.६६ महामार्गावरील कशेडी बोगदयाचे काम राष्ट्रीय महामार्ग (सा.बां.) विभागामार्फत प्रगतीत आहे. या बोगद्याच्या प्रकल्पाचे सुमारे ९८% काम पूर्ण झाले असून बोगद्याच्या पूर्ण झालेल्या भागातून सध्या वाहतूक सुरळीत सुरू आहे. कशेडी बोगद्यात काही ठिकाणी गळती असून गळती खडकाच्या स्वरूपामुळे आणि त्या ठिकाणच्या भूगर्भीय परिस्थितीमुळे होत आहे.

मुंबई-गोवा महामार्गावरील कशेडी घाटाजवळील नव्याने केलेल्या चौपदरीकरणाच्या कामामध्ये भेगा पडलेल्या नसून सदर भेगा जुन्या महामार्गावर काही ठिकाणी पडल्याचे आढळून आले. सदर ठिकाणी वाहतूक दृष्टीने सुरक्षा उपाययोजना करण्यात आल्या असून भेगा दुरुस्तीचे काम त्वरीत करण्याचे नियोजन आहे.

(२), (३) व (४) भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणामार्फत प्रगतीत असलेल्या कामांपैकी पनवेल ते कासू या ४२.३० कि.मी. लांबीपैकी ४१ कि.मी. लांबीतील काँक्रिटीकरणाचे काम पूर्ण झाले असून गडब येथील भुयारी मार्गाचे (VUP) काम अंतिम टप्प्यात आहे. तसेच, कासू ते इंदापूर या ४२.३० कि.मी. लांबीपैकी ३७ कि.मी. मधील काँक्रीटीकरणाचे काम पूर्ण झाले असून उर्वरित पाच भुयारी मार्ग व तीन उड्डाणपूलांची कामे प्रगतीत आहेत. सदर कामे डिसेंबर २०२५ अखेर पूर्ण करण्याचे नियोजन आहे. कि.मी. ०/०० ते ८४/६०० या लांबीमध्ये काही ठिकाणी भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणामार्फत दिशादर्शक फलक बसविण्यात आले असून अन्य ठिकाणी दिशादर्शक फलक बसविण्याचे काम प्रगतीत आहे.

कि.मी. ८४/६०० (इंदापूर) ते कि.मी. ४५०/१७० (झाराप) या लांबीपैकी ३३४ कि.मी. लांबीतील काँक्रिटीकरणाचे काम पूर्ण झाले असून उड्डाणपूलासहित उर्वरित काम डिसेंबर-२०२५ अखेर पूर्ण करण्याचे नियोजन आहे. इंदापूर व माणगाव बायपासच्या कामांची निविदा प्रक्रिया प्रगतीत आहे.

(५) कशेडी बोगद्याचे काम EPC तत्वावर प्रगतीत असून करारनाम्यानुसार कामाच्या देखभाल दुरुस्तीचा खर्च संबंधित ठेकेदारामार्फत करण्यात येतो. कशेडी बोगद्यातील गळतीचे निराकरण करण्यासाठी श्री.एस. के. धर्माधिकारी (MoRTH यांचे सल्लागार) यांनी सुचविलेल्या उपाययोजनानुसार सिमेंट ग्राऊटींगचे काम ८० % पूर्ण झाले असून उर्वरित काम प्रगतीत आहे. या व्यतिरिक्त आय. आय. टी. मुंबई चे तज्ञ प्राध्यापक श्री.डी. एन. सिंग यांनी सुचविलेल्या उपाययोजनानुसार बोगद्याच्या वरील भागात सिमेंट ग्राऊटींगचे काम प्रगतीत आहे.

मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्गावरील कामाची गती न राखल्याने संबंधित ठेकेदार मे. चेतक व ॲपको जे. व्ही कंपनीवर Termination ची कार्यवाही प्रगतीत आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका क्षेत्रातील जय विश्वभारती हाऊसिंग सोसायटीच्या रेखांकनात असलेल्या उद्यानामधून रस्ता बांधण्यासाठीचा करार रद्द करण्याबाबत

**(६)** * **३२५७ श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका क्षेत्रातील जय विश्वभारती हाऊसिंग सोसायटीच्या रेखांकनात असलेले उद्यान महानगरपालिकेस हस्तांतरीत करण्यात आले नसतानाही किड्स प्राईड इंग्रजी शाळेच्या व्यवस्थापन यांनी महानगरपालिकेचे अधिकारी व कर्मचारी यांच्याशी आर्थिक संगनमत करुन चुकीच्या कागदपत्रांच्या आधारे मा.न्यायालयाकडून रस्त्यासाठी आदेश प्राप्त करुन घेतल्याची बाब माहे मार्च, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शाळेने महानगरपालिकेसोबत रस्ता बांधण्यासाठी करार करुन, कराराच्या अनुषंगाने त्यांनी रस्त्याचे बांधकाम करण्यासाठी ३५ वर्षांपूर्वीच्या झाडांची कत्तल केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन जय विश्वभारती हाऊसिंग सोसायटीच्या रेखांकनात असलेल्या उद्यानामधून रस्ता बांधण्याबाबत करण्यात आलेला करार रद्द करुन मा.न्यायालयात चुकीचे कागदपत्रे सादर केल्याप्रकरणी शाळा व्यवस्थापनावर व महानगरपालिकेचे संबंधित दोषी अधिकारी/ कर्मचारी यांच्यावर गुन्हा दाखल करण्याबाबत कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.

छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका क्षेत्रासाठी मंजूर विकास योजना (सुधारीत जुनी हदद) सन २००१ नुसार आरक्षण क्रमांक-२७४- उदयान मधील जागा महानगरपालिकेस गिफ्ट डीड (दिनांक २८/११/१९७० रोजी) द्वारे उपलब्ध झालेली असून ती महानगरपालिकेच्या ताब्यात आहे.

सदर उदयानालगत असणाऱ्या Extension To Primary School या आरक्षणाखालील महानगरपालिकेच्या ताब्यातील जागा महानगरपालिका कार्यालयाने दिनांक ०५/१२/२०२३ रोजी रीतसर निविदा प्रसिध्द करुन पात्र निवेदाधारकास भाडे तत्वावर दिलेली आहे.

मा.उच्च न्यायालयात दाखल रिट याचिका क्र.५१७१/२०२४ मध्ये मा.न्यायालयाने दिनांक २३/०१/२०२५ रोजी दिलेल्या आदेशानुसार, Extension To Primary School या आरक्षणातील जागेस पोच रस्ता नसल्याने एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीतील नियम क्र. ३/०३/१४ अन्वये सदर शाळेकरीता आरक्षण क्रमांक-२७४- उदयान मधुन पोचरस्ता उपलब्ध करुन देण्यात आला आहे.

सदर प्रकरणी, जय विश्वभारती को-ऑप हाऊसिंग सोसायटीने मा.उच्च न्यायालयात रिट याचिका क्र.२०५९/२०२५ दाखल केली असून, सदर उद्यानामधुन रस्ता करण्यास प्रतिबंध करावा अशी मागणी केली आहे. मा.उच्च न्यायालयामध्ये सदर प्रकरण प्रलंबित असून, मा.न्यायालयाच्या स्थगिती आदेशान्वये सद्य:स्थितीत सदर रस्त्याचे काम थांबवले आहे.

(२) सदर पोच रस्त्यामध्ये येणाऱ्या २७ झाडांपैकी १८ झाडांचे पुनर्रोपण केलेले असून ०६ झाडे रीतसर मान्यता घेऊन तोडली आहेत. तर उर्वरीत ०३ झाडे उदयानात तशीच उभी आहेत.
(३) व (४) प्रश्न उद्‍भवत नाही.

-----------------

## सार्वजनिक बांधकाम विभागाने अर्थसंकल्पीय तरतूदीपेक्षा अधिक रकमेच्या कामांना मंजूरी दिल्याबाबत

**(७) * ३०३४ श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सार्वजनिक बांधकाम विभागाने सन २०२३-२४ या आर्थिक वर्षात रुपये १९ हजार कोटी एवढ्या रकमेची अर्थसंकल्पीय तरतूद असताना रुपये ६४ हजार कोटी एवढ्या रकमेच्या कामांना मंजुरी दिल्याने सदर कामांची देयके निधीअभावी अदा करणे शक्य नसल्याने कंत्राटदारांची देयके प्रलंबित आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी राज्यातील रस्ता बांधकाम करणेसाठी उर्वरित निधी उपलब्ध करुन देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले :** (१) व (२) सन २०२३-२४ या आर्थिक वर्षात राज्य मार्ग, जिल्हा व इतर मार्ग या योजनेंतर्गत रुपये ३१ हजार कोटी इतक्या किंमतीची कामे मंजूर करण्यात आली आहेत.

मुळ अर्थसंकल्पातील तरतुदीव्यतिरिक्त अन्य विहित मार्गाने निधी उपलब्ध करुन सद्य:स्थितीत प्रलंबित असलेली तसेच नव्याने निर्माण होणारी देयके अदा करण्याचे नियोजन आहे
(३) प्रश्न उद्‍भवत नाही.

-----------------

## मुंबई तसेच छत्रपती संभाजीनगर येथील अग्निशमन केंद्रांमध्ये वाढ करण्याबाबत

**(८) * ३४७१ श्री.राजहंस सिंह, श्रीमती उमा खापरे, श्री.संजय केणेकर, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई शहरात दरवर्षी आगीच्या अंदाजे ५००० घटना घडत असून त्या विझविण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अखत्यारित केवळ ५१ अग्निशमन केंद्रे असल्याची बाब माहे एप्रिल, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, छत्रपती संभाजीनगर शहरासाठी किमान १५ अग्निशमन केंद्राची आवश्यकता असताना केवळ ५ अग्निशमन केंद्रे कार्यान्वित असून पुरेसे मनुष्यबळ व यंत्रसामुग्री उपलब्ध नसल्यामुळे अनेक वेळा नैसर्गिक आपत्तीमध्ये योग्य वेळी मदत न मिळाल्यामुळे नागरिकांच्या मालमत्तेचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून शहरात पुरेशी अग्निशमन केंद्रे सुरू करण्यासाठी कोणत्या उपाययोजना करण्यात येत आहेत,
(३) असल्यास, एकूण लोकसंख्या आणि लागणाऱ्या आगींच्या तुलनेत अग्निशमन दलाकडे मनुष्यबळ अपुरे असल्याची बाब निदर्शनास आली असून याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे,

(४) असल्यास, मुंबईतील तसेच छत्रपती संभाजीनगर शहरातील वाढती लोकसंख्या आणि उंच इमारतींमुळे अग्निशमन केंद्रांची संख्या तसेच अग्निशमन दलातील कर्मचाऱ्यांची संख्याही वाढविण्याची आवश्यता असून शहरात पुरेसे अग्निशमन केंद्रे सुरू करण्यासाठी शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या आहेत तसेच मुंबईतील अग्निशमन केंद्रांची संख्या व कर्मचारी संख्या वाढविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही वा उपायोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) मुंबई शहरामध्ये जानेवारी २०२४ ते दिनांक १५/०२/२०२५ पर्यंत ५९६९ आगीच्या दुर्घटना घडलेल्या आहेत. सद्य:स्थितीत मुंबई अग्निशमन दलाकडे ३५ अग्निशमन केंद्रे, १९ लघु अग्निशमन केंद्रे आणि विभागनिहाय २२ अग्निशमन केंद्रे कार्यरत आहेत. त्याचप्रमाणे नव्याने ५ अग्निशमन केंद्रे प्रस्तावित करण्यात आलेली आहेत.
(२) छत्रपती संभाजीनगर शहराकरीता ०५ अग्निशमन केंद्र कार्यान्वित असून अजून ०५ केंद्राची उभारणी प्रस्तावित आहे. तसेच, अग्निशमन विभागासाठी फायर वॉटर टेंडर ८, फोम टेंडर ०२, रेस्क्यु व्हॅन ०१ व क्विक रिस्पॉन्स व्हाईकल २ असे एकूण १५ अग्निशमन वाहने तसेच उंच इमारतीसाठी ७० मीटर लेंडर खरेदी करण्याची प्रक्रिया चालु आहे.
(३) सन २०११ च्या जनगणनेनुसार बृहन्मुंबई शहराची लोकसंख्या साधारण १ कोटी २५ लक्ष असून मुंबई अग्निशमन दलातील ५४ केंद्रामध्ये (३५ अग्निशमन केंद्रे व १९ लघु अग्निशमन केंद्रे) १५३- अधिकारी, १- दुय्यम अधिकारी, २६६- प्रमुख अग्निशामक, ४३०- चालक यंत्रचालक, १७९९- अग्निशामक कार्यरत आहेत. सन २०२५-२६ मध्ये अग्निशमन दलाकरीता रिक्त पदे भरण्याबाबतची कार्यवाही बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या स्तरावर सुरू आहे.

सन २०११ च्या जनगणनेनुसार छत्रपती संभाजीनगर शहराची लोकसंख्या १२,२८,०३२ असून शहरात पाच अग्निशमन केंद्रासाठी ३८ कायमस्वरुपी व ११० कंत्राटी अधिकारी/कर्मचारी कार्यरत आहे. तसेच छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेकडून अग्निशमन विभागाचे १२१ पदे भरण्याची कार्यवाही सुरु असून त्यामध्ये उप अग्निशमन केंद्र अधिकारी-०४, अग्निशामक-१०० व ड्रायव्हर ऑपरेटर-१७ पदे भरण्यात येणार आहे.
(४) मुंबईमध्ये सध्या ३५ अग्निशमन केंद्रे, १९ लघु अग्निशमन केंद्रे आणि २२ विभाग कार्यालयवार अशी एकूण ७६ अग्निशमन केंद्रे कार्यान्वित आहेत. तसेच, नव्याने दोन अग्निशमन केंद्र (ठाकुर विलेज अग्निशमन केंद्र व कांजुरमार्ग अग्निशमन केंद्र) लवकरच कार्यान्वित करण्यात येत आहेत. त्याचप्रमाणे नव्याने ५ अग्निशमन केंद्रे प्रस्ताविण्यात आलेली आहेत.

छ.संभाजीनगर शहरात सध्या पाच अग्निशमन केंद्र असून ३८ कायमस्वरुपी व ११० कंत्राटी अधिकारी/कर्मचारी कार्यरत आहे. शहर विकास आराखडा मध्ये नवीन पाच ठिकाणी अग्निशमन केंद्रासाठी जागा राखीव ठेवण्यात आलेल्या आहेत त्यानुसार सदर ५ ठिकाणी अग्निशमन केंद्र उभारणीचे काम प्रस्तावित करण्यात आले असून त्यापैकी हर्सुल व शहागंज याठिकाणी काम सुरु करण्यात आले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## बदलापूर (जि.ठाणे) येथे पंतप्रधान आवास योजनेंतर्गतच्या प्रकल्पातील घरांचे बांधकाम अपूर्णावस्थेत असल्याबाबत

**(९) * ३७२३ श्री.संजय खोडके :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बदलापूर (जि.ठाणे) येथे पंतप्रधान आवास योजनेंतर्गत बांधण्यात येणाऱ्या २ हजार २९८ घरांचा प्रकल्प विकासकाने वेळेत पूर्ण न केल्यामुळे रुपये २५५ कोटी एवढा अपेक्षित असणारा खर्च रुपये ४३४ कोटी एवढ्या रकमेपर्यंत गेल्याचे माहे एप्रिल, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ३२५ चौ.फूट क्षेत्रफळाचे घर रुपये ११ लाख २० हजार एवढ्या रकमेमध्ये देण्याचे मान्य केले असताना आता त्या घरासाठी नागरिकांकडून रुपये १७ लाख ५० हजार एवढी रक्कम आकारण्याचा निर्णय घेतला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यामुळे सर्वसामान्य गरीब जनतेला सदर योजनेतून वाढलेल्या घरांच्या किंमती पाहता घरे घेणे आवाक्याबाहेर गेल्यामुळे सदर योजना अयशस्वी झाली असून घरांच्या किंमती वाढविण्याची कारणे काय आहेत, तसेच विहित कालावधीत योजना पूर्ण करण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) अंशत: खरे आहे.

(२) व (३) कुळगांव बदलापूर नगरपरिषद कार्यक्षेत्रात प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) अंतर्गत घटक क्र.१ व घटक क्र.३ मध्ये एकूण रुपये २५५.९१ कोटी रकमेच्या प्रकल्पास केंद्रीय व संनियंत्रण समितीची मान्यता प्राप्त झाली. त्यानुसार नगरपरिषदेने जाहीर निविदा प्रसिध्द केली असता त्यामध्ये मे.रामलिंगम कंन्स्ट्रक्शन प्रा.लि.बंगळूर यांची सर्वात कमी किंमतीची निविदा प्राप्त झाल्याने त्यास नगरपरिषदेच्या सर्वसाधारण सभेने मान्यता दिल्यानंतर कंत्राटदारास कार्यादेश देण्यात आले. सदर प्रकल्पाचे काम सुरु करण्यासाठी आवश्यक असलेल्या सर्व मंजूऱ्या तसेच ना-हरकत प्रमाणपत्र प्राप्त करुन घेण्यास प्रशासकीय विलंब झाल्यामुळे तसेच दरम्यानच्या कालावधीत आलेल्या कोवीड-१९ महामारीमुळे प्रकल्पाचे बांधकाम वेळेवर सुरु होऊ शकले नाही.

निविदा प्रसिध्द केली त्यावेळी कंत्राटदरास जे दर निश्चित करुन देण्यात आले होते त्याचे अंदाजपत्रक सन २०१७-१८ च्या दरसूची (DSR) नुसार होते. प्रकल्पाचे प्रत्यक्ष बांधकाम सन २०२१ मध्ये सुरु झाल्यानंतर कोवीड-१९ महामारीमुळे बांधकाम साहित्याच्या दरात झालेली प्रचंड वाढ व कुशल मनुष्यबळाच्या कमतरतेमुळे प्रकल्पाच्या कामाच्या गतीवर परिणाम झाला. महागाई निर्देशांकानुसार बांधकाम साहित्यात झालेली भाववाढ तसेच वाढीव GST ग्राहय धरुन मंजूर प्रकल्पास भाववाढीनुसार सुधारीत मंजूरी देण्याची मागणी कंत्राटदाराने केली. प्रसिध्द केलेल्या निविदेमध्ये भाववाढीची तरतूद नसल्याने कंत्राटदारास सुधारीत दराप्रमाणे भाववाढ देण्यासाठी प्रस्तावास राज्य व केंद्र शासनाची पुन:श्च मंजूरी घेणे आवश्यक असल्याने तसा ठराव नगरपरिषदेने पारीत करुन प्रस्ताव म्हाडा कार्यालयास सादर केला. मंजूर प्रकल्पातील घरकुलांच्या वाढीव किंमतीस राज्यस्तरीय मुल्यमापन समितीने मान्यता दिली असून नगरपरिषदेमार्फत पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राष्ट्रीय क्षयरोग दूरीकरण कार्यक्रमांतर्गत कार्यरत कर्मचाऱ्यांचे वेतन प्रलंबित असल्याबाबत

**(१०) * ३७७४ श्री.अमोल मिटकरी, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.शिवाजीराव गर्जे, श्री.संजय खोडके :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रात राष्ट्रीय क्षयरोग दूरीकरण कार्यक्रमांतर्गत (NTEP) मुंबई शहरातील महानगरपालिका रुग्णालय व आरोग्य केंद्रांवर एकूण ४५० कर्मचारी कार्यरत असून या कर्मचाऱ्यांना गत दोन महिने तर राज्यातील उर्वरित कर्मचाऱ्यांना चार महिन्यांपासून वेतन मिळाले नसल्याचे दिनांक ५ मे, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, निधी दिला नसल्याने या कर्मचाऱ्यांपुढे आर्थिक संकट उभे राहिले असून अद्याप वेतन देण्यात न आल्यामुळे कर्मचाऱ्यांच्या कुटुंबियांना आर्थिक समस्यांना सामोरे जावे लागत असून दरम्यानच्या काळात या सर्व कर्मचाऱ्यांचे वेतन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) व (२) राष्ट्रीय क्षयरोग दूरीकरण कार्यक्रमांतर्गत मुंबई जिल्हा क्षयरोग नियंत्रण संस्थेमध्ये एकूण ४७७ कर्मचारी कार्यरत असून त्यांचे माहे मार्च २०२५ चे वेतन दिनांक ०८ मे,२०२५ रोजी अदा करण्यात आले आहे. तसेच माहे एप्रिल व मे, २०२५ चे वेतन दिनांक २६ जून, २०२५ रोजी बँकेत जमा करण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पिंपरी -चिंचवड शहरातील बसमध्ये प्रवाशांकरीता मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत

**(११) * ३८५५ श्री.अमित गोरखे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पिंपरी -चिंचवड शहरातील (जि.पुणे) पुणे महानगर परिवहन महामंडळाच्या (PMPML) बस सेवेचा चिखली व निगडी (जि.पुणे) परिसरातून रोज हजारो प्रवासी लाभ घेत असून बस मध्ये प्रथमोपचार पेटी व अग्निशमन यंत्रणा कार्यान्वित असणे गरजेचे असून, प्रवाशांकरीता मूलभूत सोयी-सुविधा उपलब्ध होत नसल्यामुळे अनेक समस्यांना सामोरे जावे लागत असल्याची बाब माहे एप्रिल, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पुणे महानगर परिवहन महामंडळाच्या बसेसची पाहणी करून प्रवाशांना आपत्कालीन परिस्थितीत मदत मिळावी याकरीता प्रथमोपचार पेट्या अद्ययावत ठेवणे व त्या व्यवस्थित काम करतात याची खातरजमा करणे, अग्निशमन सिलेंडरची तपासणी करून सिलेंडरची सुरक्षितता आणि योग्यरित्या हाताळण्याची माहिती याबाबत चालकांना मार्गदर्शन करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे अंशत: खरे आहे.

बसेसमध्ये प्रथमोपचार पेटी व अग्निशमन यंत्रणा कार्यान्वित ठेवण्याबाबत डेपो मेन्टनन्स इंजिनिअर यांना वेळोवेळी सूचना देण्यात आल्या आहेत.

(२) बसेसमध्ये प्रथमोपचार पेटी असून वेळोवेळी अद्यावत करण्यात येते. तसेच बसेसमध्ये फायर एस्टिंग्युशर (Fire Extinguisher) आहेत. फायर एस्टिंग्युशरच्या वापराबद्दल डेपोतील सेवकांना प्रशिक्षण देण्यात आले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कल्याण (जि.ठाणे) येथील श्री सप्तश्रृंगी इमारतीचा स्लॅब कोसळून मृत्यूमुखी पडलेल्या व्यक्तींच्या कुटुंबियांना आर्थिक मदत देण्याबाबत

**(१२) * ३८८३ श्री.सचिन अहिर, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कल्याण (जि.ठाणे) पूर्व भागातील श्री सप्तश्रृंगी इमारतीच्या चौथा मजल्याचा स्लॅब दिनांक २० मे, २०२५ रोजी कोसळून सहा जणांचा मृत्यू झाला असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, स्लॅब कोसळण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास,शासनाने चौकशी करुन सदर प्रकरणी जबाबदार असणाऱ्या संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) असल्यास, सदर दुर्घटनेतील मृतांच्या वारसांना व जखमींना आर्थिक मदत देण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) कल्याण पूर्वेतील सप्तशृंगी चारमजली इमारतीमधील चौथ्या मजल्यावरील स्लॅब कोसळून झालेल्या दुर्घटनेत जखमी रहिवाशांपैकी ६ व्यक्तींचे मृत्यू झाले होते व उपचारादरम्यान एका रहिवाशाचे मृत्यू झाला आहे,असे एकूण ७ रहिवाशांचे मृत्यू झाले, ही वस्तुस्थिती आहे
(२) व (३) सदर इमारतीमधील एका सदनिकाधारकाने महानगरपालिकेची परवानगी न घेता, तसेच इमारतीमधील इतर सदनिकाधारकांच्या सुरक्षिततेची काळजी न घेता, परस्पर स्वत:च्या सदनिकेचे दुरूस्तीचे काम सुरू केले होते. त्यामध्ये त्याच्या सदनिकेचे फ्लोरींग कोसळून त्या खालील सदनिकेचे स्लॅब एकमेकांवर आदळून ही दुर्घटना घडली आहे. सदर सदनिकाधारकावर स्थानिक पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. सदर इमारतीबाबत प्राप्त स्ट्रक्चरल ऑडीट रिपोर्टच्या आधारे इमारत धोकादायक घोषित करून पूर्णत: निष्कासनाची कारवाई करण्यात आलेली आहे.
(४) सदर दुर्घटनेतील मयत व्यक्तींच्या कुटुंबियांना मा.मुख्यमंत्री सहायता निधी मधून प्रत्येकी रुपये ५ लक्ष इतकी आर्थिक मदत करण्यात आलेली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## गोदावरी नदी प्रदूषण मुक्त करण्यासाठी उपाययोजना करण्याबाबत

**(१३) * ४११३ श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, डॉ.परिणय फुके, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सन २०१८ मध्ये मा.उच्च न्यायालयाने निर्देश देऊनही गोदावरी नदीची स्थिती सुधारली नसल्याने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने आयुक्त, नाशिक महानगरपालिका यांच्यावर अवमानाची कारवाई करण्यासाठी मा.उच्च न्यायालयाने नोटीस बजाविली असल्याची बाब माहे मे, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गोदावरी नदीमध्ये सांडपाणी, कंपन्यांचे रसायनयुक्त पाणी सोडण्यात येते तसेच अन्य घटक ही नदीच्या प्रदूषणाला कारणीभूत असल्याने मा.उच्च न्यायालयाने दिनांक १८ डिसेंबर, २०१८ रोजी नाशिक महानगरपालिकेस गोदावरी नदी प्रदूषणमुक्त करण्याचे आदेश दिले होते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी सात वर्षाचा कालावधी होवून देखील गोदावरी नदी प्रदूषणमुक्त न झाल्याने तसेच सन २०२७ मध्ये होणारा सिंहस्थ कुंभमेळा प्रदूषणमुक्त करण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे काय,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) नाशिक मनपाने मलनिःसारण योजनेंतर्गत ६ ठिकाणी एकूण ३९२.५० MLD क्षमतेचे ११ मलजल शुध्दीकरण केंद्र उभारलेले असून त्यात सांडपाण्यावर प्रक्रिया करुनच पाणी नदीत सोडण्यात येते.

नाशिक शहरातील मलनिःसारण व्यवस्थेमध्ये सुधारणा करणेसाठी अस्तित्वातील STP प्रकल्पांमध्ये सुधारणा करणे व नविन STP प्रकल्प उभारणेची कामे PPP-HAM Model वर राबविण्यास शासन निर्णय दिनांक ०९/०६/२०२५ अन्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आली असून महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागामार्फत दिनांक ११/०६/२०२५ रोजी तांत्रिक मान्यता प्राप्त झाली आहे. त्याअनुषंगाने कंत्राटदार यांना दिनांक १३/०६/२०२५ रोजी कार्यादेश (LOA) निर्गमित करण्यात आलेले आहे.

गोदावरी नदीत प्रदूषण होऊ नये व त्याचे संनियंत्रण करणेसाठी नाशिक मनपाने स्वतंत्र गोदावरी संवर्धन कक्ष स्थापन केला आहे. नदी कायम स्वच्छ राहण्यासाठी दैनंदिन स्वच्छता करण्यात येत आहे. तसेच गोदावरी व उपनदयांच्या प्रदुषणा बाबत नागरीकांना तक्रार करता यावी याकरीता NMC e-connect App मध्ये व्यवस्था करण्यात आली आहे.गोदावरी नदी पात्रात वाढलेल्या पाणवेली Trash Skimmer ने वेळोवेळी काढण्यात येत आहेत. तसेच गोदावरी नदी व तिच्या उपनद्या प्रदूषण मुक्त करण्यासाठी दिर्घ मुदतीच्या व तातडीच्या उपाययोजना करीता निरी संस्थेच्या मार्गदर्शनानुसार नाशिक मनपा सर्वोतोपरी प्रयत्न करीत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राजगुरुनगर नगरपरिषदेच्या कचरा संकलन व प्रक्रिया केंद्रास ग्रामस्थांचा विरोध असल्याबाबत

**(१४)** * **४१८७ श्री.दादाराव केचे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे खालची भांबुरवाडी (ता.खेड, जि.पुणे) या महसूली गावातील सातबारा उताऱ्यावर व मौजे टाकळकरवाडीच्या ताब्यातील, वहीवाटीतील व हद्दीतील गट क्र. ६ ही गायरान (गुरे चराई) मिळकत असलेल्या जमिनीत राजगुरुनगर नगरपरिषदेच्या कचरा संकलन व प्रक्रिया केंद्रास स्थानिक ग्रामस्थांचा तीव्र

विरोध असून त्यासंदर्भात दिनांक ८ मार्च, २०२५ रोजी ठराव पारित करण्यात आला असून "कचरा संकलन केंद्र विरोधी कृती समिती" मार्फत मा.मुख्यमंत्री, मा.उपमुख्यमंत्री (तथा पालकमंत्री पुणे), मा.महसूल मंत्री, मा.ग्रामविकास मंत्री, मुख्य सचिव, जिल्हाधिकारी पुणे व विभागीय आयुक्त, पुणे यांना दिनांक २० मे २०२५ रोजी लेखी निवेदन सादर करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी स्थानिक ग्रामस्थांनी प्रांत कार्यालयावर मोर्चा काढून आपला निषेध नोंदविला असल्याचे माहे एप्रिल, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रस्तावित कचरा संकलन व प्रक्रिया केंद्रामुळे सदर परिसरातील रहिवाशांच्या, विशेषतः लहान मुले व वृध्द व्यक्तींच्या आरोग्यावर प्रतिकूल परिणाम होण्याची तसेच प्रक्रिया केंद्रासाठी ने - आण करणाऱ्या कचरा वाहतूक करणाऱ्या वाहनांची ये-जा वाढल्यास स्थानिक परिसरात अपघात होण्याची शक्यता निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी स्थानिक ग्रामस्थांनी दिलेल्या निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) हे खरे नाही.

मौजे खालची भांबुरवाडी, ता.खेड, जि.पुणे येथील सरकारी गायरान जमीन गट क्र.६ ही राजगुरुनगर नगरपरिषदेच्या कचरा संकलन व प्रक्रिया केंद्रासाठी देण्यास मान्यता प्रदान करण्यात आली आहे.

राजगुरुनगर परिषदेमार्फत सदर ठिकाणी कोणत्याही प्रकारच्या घनकचऱ्यांची साठवणूक करण्यात येणार नसून सदर प्रकल्प हा कचऱ्यावर प्रक्रिया करण्याचा प्रकल्प आहे. त्यामुळे सदर परिसरातील रहिवाशांच्या आरोग्यावर प्रतिकूल परिणाम होण्याची शक्यता नाही.

राजगुरुनगर शहरात दररोज १२ टन ओला व ६ टन सुका कचरा निर्माण होतो. सदर कचरा वाहतूक करण्याकरीता नगरपरिषद कॉम्पॅक्टर वाहनाचा वापर करणार असल्यामुळे कचरा संकलन व प्रक्रिया केंद्रावर सदर वाहनाच्या जास्तीत जास्त दोन फेऱ्या होण्याची शक्यता असल्याने वाहनांची ये-जा वाढण्याची व स्थानिक परिसरात अपघात होण्याची शक्यता नाही.

(४) राजगुरुनगर नगरपरिषदेमार्फत उभारण्यात येणारे कचरा संकलन केंद्र हे घनकचरा व्यवस्थापन नियम, २०१६ व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ तसेच स्वच्छ महाराष्ट्र अभियान संचालनालय यांच्या मार्गदर्शक तत्वानुसार होणार आहे. सदर प्रकल्पामुळे आजुबाजूच्या परिसरास किंवा गावांना कोणतीही अडचण होणार नाही याची नगपरिषदेमार्फत खबरदारी घेण्यात येईल.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सिध्दार्थनगर, गोरेगाव (मुंबई) येथील गृहनिर्माण संस्थेच्या पत्राचाळ रहिवाशांना भोगवटा प्रमाणपत्र न देता लॉटरी काढली असल्याबाबत

**(१५)** * **४२७७ श्रीमती चित्रा वाघ :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिध्दार्थनगर, गोरेगाव (मुंबई) येथील गृहनिर्माण संस्थेच्या पत्राचाळ रहिवाशांना पूर्ण भोगवटा प्रमाणपत्र न देताच आर-९ ही लॉटरी ऑनलाईन पध्दतीने काढली असल्याची बाब माहे एप्रिल, २०२५ च्या मध्ये वा

त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पत्राचाळ प्रकल्पातील ७२ अनधिकृत गाळे म्हाडाने रद्द केले, परंतु सदर सदनिकांच्या व सोळा इमारतींच्या सुरक्षा भिंतीची, ड्रेनेज लाईन, चेकर टाइल्स, बेसमेंट, पार्किंग स्पेस तयार करणे इ. कामे अपूर्ण असून व सदर कामे निकृष्ट दर्जाची केली असूनही पत्राचाळ प्रकल्पाला संपूर्ण भोगवटा प्रमाणपत्र देणार असल्याचे म्हाडाकडून सांगण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, पत्राचाळ प्रकल्पातील सोळा इमारतींची व तेथील सदनिकांची अंतर्गतची कामे रहिवाशांना सदनिकांचे वाटप करण्यापूर्वी पूर्ण करुन लवकरात लवकर सदनिका उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या (म्हाडा) संबंधित दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही. सदरहू प्रकल्पाला म्हाडाच्या इमारत परवानगी कक्षामार्फत दिनांक ०२/०४/२०२५ रोजी संपूर्ण भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त झाले. त्यानंतरच दिनांक ०४/०४/२०२५ रोजी R-९ प्रकल्पातील पात्र सभासदांची संगणकीय प्रणालीद्वारे सोडत काढण्यात आली आहे.
(२) व (३) हे खरे नाही. सदरहू प्रकल्पामध्ये तळमजल्यावर ७२ व्यापारी गाळे बांधण्याचे प्रस्तावित होते. परंतु उपाध्यक्ष म्हाडा यांचे समवेत सिद्धार्थनगर (पत्राचाळ) गृहनिर्माण संस्थेच्या पदाधिकाऱ्यांसमवेत झालेल्या चर्चेनंतर सदरहू अनिवासी गाळयांचे बांधकाम रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. पत्राचाळ प्रकल्पातील सोळा इमारतींची व तेथील सदनिकांची अंतर्गत कामे पूर्ण करण्यात आल्यानंतर, सदरहू प्रकल्पाला म्हाडाच्या इमारत परवानगी कक्षामार्फत दिनांक ०२/०४/२०२५ रोजी संपूर्ण भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त झाले.सदनिकांचे रहिवाश्यांना वाटप करण्याच्या दृष्टीने सदनिका उपलब्ध आहेत.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## भिवंडी (जि.ठाणे) येथून विनापरवाना उत्पादीत सौंदर्य प्रसाधनांचा साठा जप्त केल्याबाबत

**(१६)** * **४२८१ श्री.संजय केणेकर :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्याच्या अन्न व औषध प्रशासन विभागाने भिवंडी (जि.ठाणे) येथील दोन गाळयांवर टाकलेल्या धाडीत विनापरवाना सुरु असलेल्या कारखान्यातील सौंदर्यांची साधने जप्त केल्याचे माहे एप्रिल, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर गाळयांमधील इतर सौंदर्य प्रसाधनांचे पॅकिंग लेबलिंग मटेरियल ही जप्त करण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी आढळून आलेल्या संबंधित दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.नरहरी झिरवाळ :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) अन्न व औषध प्रशासनाने दिनांक ०३/०४/२०२५ रोजी ठाणे येथे मे. मिर्फी हेल्थकेअर, भिवंडी व मे. नरेंद्र मार्केटिग, भिंवडी या संस्थेमधून विना परवाना उत्पादीत सौंदर्य प्रसाधनाचा साठा, स्टिकर लेबल, कार्टन, रिकाम्या बाटल्या इत्यादी पंचानाम्याअंतर्गत जप्त करण्यात आल्या आहेत. जप्त करण्यात आलेल्या साठ्याच्या अनुषंगाने मा.न्यायदंडाधिकारी, भिवंडी येथे सेफ कस्टडीसाठी दिनांक ०४/०४/२०२५ रोजी अर्ज करण्यात आला आहे. तसेच, उक्त दोन संस्थांकडून सौंदर्य प्रसाधनांचे एकूण तीन नमुने विश्लेषणासाठी घेण्यात आले आहे. विश्लेषण अहवालाच्या अनुषंगाने त्यांचेविरुध्द न्यायालयीन कारवाई करण्यात येईल.

सदर दोन्ही संस्थांना घाऊक औषध विक्री परवाने मंजूर होते. विषयांकित संस्थांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात येऊन घाउक औषध विक्री परवाने दिनांक २९/०९/२०२५ पासून रद्द करण्यात आल्याचे आदेश निर्गमित करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## बृहन्मुंबई महानगरपालिकेंतर्गत कार्यरत आयुष वैद्यकीय अधिकाऱ्यांना सेवेत कायमस्वरुपी सामावून घेण्याबाबत

**(१७)** * **४३०९ ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, डॉ.परिणय फुके, श्रीमती उमा खापरे, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बृहन्मुंबई महानगरपालिकेत कार्यरत आयुष वैद्यकीय अधिकाऱ्यांना रुपये ४२,०००/- एवढे मानधन देण्यात येत असून, त्यांना केवळ ६ महिन्यांच्या कंत्राटी पध्दतीने नियुक्ती दिली जात आहे, तर त्याच आरोग्य केंद्रात एम.बी.बी.एस.वैद्यकीय अधिकाऱ्यांना ८०,०००/- मानधन व तीन वर्षांनंतर कायमस्वरूपी नियुक्ती दिली जात असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ही विषमता दूर करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली तसेच "समान काम, समान वेतन" या तत्वानुसार आयुष अधिकाऱ्यांनाही स्थायिक व सन्मान्य वेतन देण्याची प्रक्रिया कधी सुरु होणार आहे,

(३) असल्यास, आयुष अधिकाऱ्यांच्या कामाची व्याप्ती व जबाबदाऱ्या यांचा अभ्यास करून त्यांचे स्थान निश्चित करण्यासाठी समिती गठीत करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, कोविड-१९ महामारीच्या कालावधित काम केलेल्या आयुष वैद्यकीय अधिकाऱ्यांना बृहन्मुंबई महानगरपालिकेत कायमस्वरूपी सामावून घेण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे अंशत: खरे आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिकेत कार्यरत आयुष वैद्यकीय अधिकाऱ्यांना हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना या योजनेंतर्गत ६ महिन्यांकरीता कंत्राटी पध्दतीने नियुक्ती दिली जात असून याबाबतचे कंत्राट दर ६ महिन्याने नविकरण करण्यात येते. केंद्र शासनाच्या CPHC (Comprehensive Primary Health Care) मार्गदर्शक सुचनानुसार तसेच सहसंचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान यांच्या दिनांक ३१/०१/२०२४ रोजीच्या परिपत्रकानुसार रुपये ४०,०००/- प्रती महिना इतके मानधन आहे. तथापि,

बृहन्मुंबई महानगरपालिकेतर्फे आयुष वैद्यकीय अधिकाऱ्यांना रुपये ४२,०००/- देण्यात येते. बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत कंत्राटी स्वरूपात घेण्यात आलेल्या एम.बी.बी.एस. वैद्यकीय अधिकाऱ्यांना ९०,०००/- मानधन देण्यात येते. तथापि, त्यांना तीन वर्षांनंतर कायस्वरूपी नियुक्ती देण्यात येत नाही.

(२) व (३) आयुष ही केंद्र शासनाची महत्वाकांक्षी योजना आहे. या योजनेबाबत धोरण निश्चिती करण्याबाबतची कार्यवाही केंद्रशासनामार्फत केली जाते.

(४) कोविड-१९ महामारी दरम्यान सेवा बजावलेल्या आयुष वैद्यकीय अधिकाऱ्यांना कंत्राटी तत्वावर हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना या योजनेंतर्गत नेमणूक देण्यात आली आहे.

कोविड-१९ महामारी दरम्यान सेवा बजावलेल्या आयुष वैद्यकीय अधिकाऱ्यांना बृहन्मुंबई महानगरपालिकेत कायमस्वरूपी सामावून घेण्याबाबत शासनाचे कोणतेही धोरण नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सातारा जिल्ह्यातील पुणे – बंगळूर महामार्गासह अन्य महामार्गांच्या रुंदीकरणासाठी वृक्षतोड करण्यात आल्याबाबत

**(१८)** * **४४१२ श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सातारा जिल्ह्यातील पुणे – बंगळूरसह अन्य महामार्गांच्या रुंदीकरणासाठी १२ हजार वृक्षांची कत्तल करण्यात आली असल्याने पर्यावरणाची मोठ्या प्रमाणावर हानी झाली असल्याची बाब दिनांक ५ जून, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू वृक्षतोड करणाऱ्या संबंधित ठेकेदार किंवा शासकीय विभागाने एकास पाच याप्रमाणे ६० हजार वृक्ष लावण्याची सक्ती असतानाही अद्यापही वृक्ष लागवड करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकणी शासनाने चौकशी करुन नियमानुसार वृक्ष लागवड न करणाऱ्या संबंधित ठेकेदार आणि विभागाच्या अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले :** (१) भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाकडून कागल सातारा राष्ट्रीय महामार्ग क्र.४८ या महामार्गाचे सहापदरीकरणाचे काम प्रगतीपथावर आहे. तसेच राष्ट्रीय महामार्ग क्र.१६६-ई महामार्गाचे दुपदरीकरण /चौपदरीकरणाचे काम सार्वजनिक बांधकाम विभागाच्या राष्ट्रीय महामार्ग विभागामार्फत प्रगतीत आहे.

या महामार्गाच्या रुंदीकरणासाठी अनिवार्य व आवश्यकतेनुसार वृक्षतोड करण्यात आली असून सदर वृक्षतोड वनविभागाची परवानगी घेऊन नियमानुसार करण्यात आली आहे.

(२) व (३) हे अंशत: खरे आहे.

कागल-सातारा राष्ट्रीय महामार्ग क्र.४८ वर ९९४८८ वृक्षारोपण करण्याचे नियोजन आहे. त्यापैकी आजपर्यंत एकूण १६२० वृक्ष लागवड करण्यात आली आहे. सातारा जिल्ह्यासाठी प्रस्तुत कागल-सातारा महामार्गाचे सहापदरीकरणाचे काम एप्रिल-२०२६ अखेर पूर्ण करण्याचे नियोजित असून उर्वरित वृक्षारोपण सदर प्रकल्पाचे काम पूर्ण झाल्यावर करण्याचे नियोजन आहे.

राष्ट्रीय महामार्ग क्र.१६६-ई महामार्गावर एकूण ११,८२५ वृक्षारोपण करण्याचे नियोजन असून त्यापैकी २००० वृक्षलागवड करण्यात आली असून उर्वरित वृक्षलागवड प्रगतीत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## आदिवासी विकास महामंडळामार्फत नाशिक जिल्ह्यातून तांदूळ खरेदीमध्ये गैरव्यवहार झाल्याबाबत

**(१९)** * **४४७५ श्री.सत्यजीत तांबे :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आदिवासी विकास महामंडळामार्फत नाशिक जिल्ह्यातून खरेदी करण्यात आलेला सुमारे ६५,४५० क्विंटल तांदूळ गुजरातमध्ये काळाबाजारात विक्रीसाठी पाठविण्यात आल्याने अंदाजित रुपये ३८ कोटी एवढ्या रक्कमेचा गैरव्यवहार झाल्याची बाब दिनांक ३ मे, २०२५ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर तांदूळ ४० रुपये प्रति क्विंटल दराने भाडे देऊन चाळीसगाव येथील डाळ मिलमध्ये प्रक्रिया करण्यासाठी पाठविण्यात आल्याचे दाखविण्यात आले, परंतु प्रत्यक्षात नाशिकहून थेट गुजरातमध्ये नेण्यात येत असताना सुरगाणा येथे स्थानिक नागरिकांनी ट्रक थांबवून सदर प्रकार उघडकीस आणला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर तांदळाचा ६५ टक्के हिस्सा पुरवठा विभागाच्या गोदामात जमा करणे आवश्यक असताना तसे न करता थेट गुजरात येथे पाठविला गेल्यामुळे संबंधित कंत्राटदार, अधिकारी व इतर घटकांच्या संगनमतातून शिधा धान्याचा अपहार करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणात गैरव्यवहार केल्याप्रकरणी ट्रकचे सीसीटीव्ही फुटेज, पेट्रोल पंपांची नोंदवही, स्थानिक पोलिसांचा अहवाल, पुरवठा खात्याच्या नोंदी, व कंत्राटदारांची जबाबदारी इ. बाबत चौकशी करून कारवाई करण्याबाबत तसेच भविष्यात अशा प्रकारांना आळा बसावा याबाबत यासाठी शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.छगन भुजबळ :** (१) व (२) दिनांक २८ एप्रिल २०२५ रोजी उचल देण्यात आलेल्या २४३७ क्विंटल धानापैकी काही धान गुजरातला नेत असल्याबाबत बातमी प्रसिध्द झाली होती. तद्नुषंगाने आदिवासी विकास महामंडळामार्फत स्थापन केलेल्या समितीकडुन चौकशी करण्यात आली आहे.

(३) गिरणीधारकाला ३४७९९.०८ क्विंटल धानाची उचल देण्यात आली. सदर धानापैकी २७२६८.६६ क्विंटल धानाचा १८२७० क्विंटल तांदूळ गिरणीधारकाकडुन शासनास जमा केला आहे.

चौकशी समितीने केलेल्या प्रत्यक्ष तपासणीमध्ये गिरणीधारकाकडे अंदाजे ७२७१.६४ क्विंटल तांदूळ व धानाच्या स्वरुपात भात आढळुन आला आहे.

(४) आदिवासी विकास महामंडळाकडुन संबंधित मिलर्सची बँक गॅरंटी रक्कम रुपये २ कोटी १० लक्ष जप्त करण्यात आली आहे. अध्यक्ष, जिल्हा धान भरडाई समिती तथा जिल्हाधिकारी, नाशिक यांचेकडुन पणन हंगाम २०२४-२५ करीताचा करारनामा रद्द करण्यात आला आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## जोगेश्वरी (मुंबई उपनगर) येथील हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे ट्रॉमा केअर रूग्णालयाचा अतिदक्षता विभाग बंद करण्यात आल्याबाबत

**(२०)** * **३१७९ श्री.श्रीकांत भारतीय :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जोगेश्वरी (मुंबई उपनगर) येथील नागरिकांना आरोग्य सुविधा तातडीने उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे ट्रॉमा केअर रूग्णालय सुरू करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू रूग्णालयामार्फत पुरविण्यात येणाऱ्या वैद्यकीय सेवेकरीता आवश्यक डॉक्टर, नर्स व इतर वैद्यकीय कर्मचारी वर्ग हे कंत्राटी पध्दतीने नियुक्त करण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या रुग्णालयात कंत्राटी पध्दतीने नियुक्त डॉक्टर, नर्स व इतर कर्मचारी वर्ग यांनी तसेच संबंधित कंत्राटदाराने कोणतीही नोटीस न देता अचानक अतिदक्षता (आय.सी.यू) विभागाची वैद्यकीय सेवा बंद करून सर्व डॉक्टर, नर्स व वैद्यकीय अधिकारी/कर्मचारी या रूग्णालयातून निघून गेल्याची बाब माहे मार्च, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या रूग्णालयातील अतिदक्षता विभागात दाखल रूग्णांना अनेक संकटांचा सामना करावा लागला असून त्यांच्या जीवितास धोका निर्माण झाला असून सेवा सोडून निघून गेलेल्या संबंधित डॉक्टर, नर्स, इतर वैद्यकीय अधिकारी / कर्मचारी तसेच संबंधित कंत्राटदार यांचेवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) असल्यास, संबंधितांवर केलेल्या कारवाईचा तपशील काय आहे, तसेच डॉक्टर, नर्स, इतर वैद्यकीय अधिकारी / कर्मचारी यांची भरती करण्यात येणार आहे काय,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे ट्रॉमा केअर रूग्णालय हे कुपर रुग्णालयाच्या अंतर्गत आहे. १० रुग्णशय्या असलेल्या अतिदक्षता विभागातील फक्त डॉक्टरांच्या सेवा कंत्राटी पध्दतीने घेण्यात आलेल्या होत्या.

(३) अतिदक्षता विभागातील कंत्राटदारामार्फत घेण्यात आलेल्या डॉक्टरांच्या सेवा कंत्राटदाराने कोणतीही पूर्वसूचना न देता अचानक बंद केल्या होत्या.

(४) कंत्राटदाराने अतिदक्षता विभागातील डॉक्टरांच्या सेवा बंद केल्यामुळे व रुग्णांची गैरसोय होऊ नये म्हणून अतिदक्षता विभागामध्ये तात्काळ कुपर रुग्णालयामार्फत वरिष्ठ व कनिष्ठ निवासी डॉक्टरांकडून वैद्यकीय सेवा देण्यात आल्या आहेत.

या रुग्णालयाच्या अतिदक्षता विभागामध्ये डॉक्टरांची सेवा देणाऱ्या मे. मॅक्सकेअर हॉस्पिटल या कंपनीस तीन वर्षाच्या कालावधीसाठी काळ्या यादीत टाकण्याबाबत कार्यवाही सुरू आहे.

(५) मे. मॅक्सकेअर हॉस्पिटल या कंपनीस ३ वर्षाकरीता काळ्या यादीत टाकून सदर कंपनीस पुढील तीन वर्षाकरीता बृहन्मुंबई महानगरपालिकेमध्ये कोणत्याही कामासाठी सहभाग घ्यावयास प्रतिबंध करण्यात येत आहे.

तसेच, अतिदक्षता विभागात तज्ञ डॉक्टरांच्या सेवा बाह्यस्त्रोतामार्फत घेण्याकरीता ई-निविदाप्रक्रिया राबविण्यात येत आहे. अतिदक्षता विभागाव्यतिरिक्त रुग्णालयातील इतर सर्व विभागामध्ये कार्यरत डॉक्टर, नर्सेस व इतर वैद्यकीय अधिकारी/कर्मचारी हे बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून नियुक्त करण्यात आले आहेत.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबईतील भूमिगत मेट्रोच्या सहा ट्रेन प्रवासी वाहतुकीकरीता कार्यान्वित करण्याबाबत

**(२१) * २५७४ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.राजेश राठोड, श्री.अभिजित वंजारी, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सुधाकर अडबाले, श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील भूमिगत मेट्रोच्या सहा ट्रेन कारशेडमध्ये विनावापर पडून असल्याचे माहे एप्रिल, २०२५ च्या पहिल्या सप्ताहात वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या परिवहन सेवेला प्रवाशांचा प्रतिसादही अत्यल्प असून परिवहन सेवेचा प्रवाशांना प्रतिसाद मिळवून देणे व सदरील ट्रेन कार्यान्वित करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) व (२) हे खरे नाही.

मुंबई मेट्रो लाईन-३ या प्रकल्पाकरीता एकूण २८ ट्रेन प्राप्त झाल्या आहेत. त्यापैकी १८ ट्रेनसेटची चाचणी झाली असून त्या प्रवाशांच्या सेवेसाठी वापरल्या जात आहेत. उर्वरित १० ट्रेनसेटची चाचणी आणि कार्यान्वित करण्याची प्रक्रिया सुरू असून मुंबई मेट्रो लाईन-३ मधील आचार्य अत्रे चौक ते कफ परेड या मेट्रो मार्गिकेच्या पूर्व चाचण्यांसाठी वापरल्या जात आहेत. तसेच संपूर्ण मेट्रो लाईन-३ आरे ते कफ परेड पर्यंत माहे ऑगस्ट, २०२५ मध्ये सुरु करण्याचे नियोजन करणेत आले आहे. मेट्रो लाईन-३ ही आरे ते कफ परेड संपूर्णपणे कार्यान्वित झाल्यानंतर या सर्व २८ मेट्रो ट्रेन प्रवासी वाहतूक सेवेकरीता उपयोगात येतील.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबई शहर व उपनगरातील अतिधोकादायक इमारती निष्कासित करण्याबाबत

**(२२) * २८७५ ॲड.अनिल परब, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.कृपाल तुमाने :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहर व उपनगरातील अतिधोकादायक इमारती तात्काळ रिकाम्या कराव्यात तसेच अनधिकृत बांधकामाविरोधात कारवाई करावी असे आदेश अतिरिक्त आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी दिले असल्याची बाब माहे एप्रिल, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त आदेशानुसार दिनांक १३ मे, २०२५ पर्यंत किती ठिकाणी कारवाई झाली व किती धोकादायक व अनधिकृत बांधकामासंदर्भात कोणत्या स्वरुपाची कारवाई करण्यात आली आहे,

(३) असल्यास, संभाव्य दुर्घटना टाळण्याकरीता अतिधोकादायक इमारती रिकाम्या करून निष्कासित करण्याबाबत तसेच अनधिकृत बांधकाम पाडण्याबाबत शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) अतिरिक्त आयुक्त (शहर) यांनी दिनांक २३ एप्रिल, २०२५ रोजी घेतलेल्या आढावा बैठकीदरम्यान अनधिकृत बांधकामांविरोधात कार्यवाही करण्याचे आदेश दिले आहेत.
(२) व (३) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या धोरणानुसार ३० वर्षांपेक्षा जास्त जुन्या इमारतींचे संरचनात्मक परिक्षण करणे, अतिधोकादायक इमारतींचा सी-१ प्रवर्गात समावेश करणे, सी-१ प्रवर्गात समाविष्ट इमारती रिक्त करून निष्कासित करण्याची कारवाई स्तरावर नियमितपणे करण्यात येते.

बृहन्मुंबई महानगरपालिकेतर्फे दिनांक १३ मे, २०२५ पर्यंत १९७ तसेच दिनांक २४ जून, २०२५ पर्यंत एकूण ३६६ अनधिकृत बांधकामांचे निष्कासन करण्यात आलेले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## छत्रपती संभाजीनगर येथील नारेगाव डंपिंग ग्रांऊंडमधील कचरा विल्हेवाट करण्याकरीता जी.एन.आय. कन्स्ट्रक्शनला दिलेली निविदा रद्द करण्याबाबत

**(२३) * ३२९३ श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) छत्रपती संभाजीनगर शहरातील नारेगाव डंपिंग ग्राऊंडमध्ये साचलेल्या कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी महानगरपालिकेच्या माध्यमातून बायोमायनिंगच्या निविदा प्रक्रियेत बायोमायनिंगसारख्या तांत्रिक प्रक्रियेचा कोणताही अनुभव नसलेल्या जी.एन.आय. कन्स्ट्रक्शन, छत्रपती संभाजीनगर या कंत्राटदारास निविदा देण्यात आली असल्याची बाब माहे मार्च, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू कंत्राटदारास महानगरपालिकेच्या इतर कामांमध्ये निकृष्ट दर्जाचे बांधकाम केल्याने काळ्या यादीत टाकूनही महानगरपालिकेच्या अधिकारी/कर्मचारी यांच्याशी असलेल्या आर्थिक हितसंबंधामुळे सदरहू निविदा प्रक्रियेत समाविष्ट करुन उक्त निविदा त्यांना देण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, महानगरपालिकेच्या कचऱ्याची विल्हेवाट व निर्जंतुकीकरणासाठी योग्य नियोजन केल्याप्रमाणे रुपये १५ ते २० कोटींचा खर्च होणे अपेक्षित असताना महानगरपालिकेच्या अधिकारी/कर्मचारी यांनी रुपये ७९ कोटी इतक्या अधिकच्या रकमेचे अंदाजपत्रक तयार केले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने बायोमायनिंगच्या तांत्रिक प्रक्रियेचा कोणताही अनुभव नसलेल्या जी.एन.आय. कन्स्ट्रक्शनला देण्यात आलेली निविदा रद्द करुन कचरा व्यवस्थापन करण्याबाबत पुनर्निविदा राबवून यामध्ये दोषी असलेल्या महानगरपालिकेच्या संबंधित दोषी अधिकारी/कर्मचारी यांचेवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.

छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेने सदर कामासाठी नियमानुसार निविदा प्रक्रिया राबवून L-१ निविदाधारक जी.एन.आय. इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि., छत्रपती संभाजीनगर यांना लिगसी वेस्ट च्या बायोमायनिंगचे काम देण्यात आले आहे.

(२) हे खरे नाही.

संबंधित कंत्राटदार जी.एन.आय. इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि., छत्रपती संभाजीनगर यांना महानगरपालिकेकडून काळ्या यादीत टाकण्यात आले नाही.

(३) हे खरे नाही.

नगरविकास विभागाच्या दिनांक ३१/०८/२०२३ रोजीचे शासन निर्णयान्वये छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या जुन्या साठलेल्या कचऱ्यावर बायोमायनिंग करण्याबाबतच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने रुपये ६६.७० कोटी इतक्या रकमेकरीता मंजुरी देण्यात आली.

सदर कामासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून दिनांक २९/०७/२०२४ रोजीचे आदेशान्वये तांत्रिक मान्यता प्रदान करण्यात आली असून महानगरपालिकेने निविदा प्रक्रियेनुसार पात्र L-१ निविदाधारक जी.एन.आय. इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. यांना १० लाख मे. टन करीता रुपये ७९.०० कोटी (६७.०० कोटी अधिक १२ कोटी जीएसटी) इतक्या रक्कमेचे बायोमायनिंगचे काम दिले आहे.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## जळगाव जिल्ह्यातील रस्त्यांची दुरवस्था झाल्याबाबत

**(२४) * ३९८२ श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चोपडा-यावल नावरे (ता.यावल, जि.जळगांव) तसेच सावदा ते हतनूर (ता.रावेर, जि.जळगांव) या रस्त्यांची कामे निकृष्ट दर्जाची झाल्यामुळे रस्त्यांची दुरवस्था झाली असून, ग्रामस्थांनी सदर रस्त्याची दुरुस्ती होणेबाबत दिनांक ५ एप्रिल, २०२५ रोजी वा त्यासुमारास मागणी केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अमळनेर-निम (जि.जळगांव) रस्त्याची दुरवस्था झाली असून आवश्यकता नसताना देखील उक्त रस्त्यावर रुपये दिड कोटी एवढ्या रक्कमेच्या पुलाचे बांधकाम मंजूर करण्यात आले असून उक्त प्रकरणी अनावश्यक कामे मंजूर करून शासनाच्या निधीचा अपव्यय करणाऱ्या दोषी अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, जळगांव जिल्ह्यातील उपरोक्त रस्त्यांची दुरुस्ती करण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले :** (१) चोपडाऱ्यावल-नावरे हा रस्ता राष्ट्रीय महामार्ग-७५३BE चा भाग असून सदर रस्त्याचे डांबरीकरणाचे काम करारनाम्याच्या तरतुदीप्रमाणे पूर्ण झाले असून सदर रस्ता सद्य:स्थितीत वाहतुकीस सुस्थितीत आहे.

सावदा ते हतनूर रस्ता प्रजिमा-१६ दर्जाचा असून सदर रस्त्यावर सा.क्र. किमी ०/०० ते ०९/०० या लांबीत मजबुतीकरण व डांबरीकरण तसेच सा.क्र. किमी ०५/०० ते ०५/५०० या लांबीत कॉक्रीटीकरणाचे

काम प्रगतीत असून सद्य:स्थितीत रस्त्यावरील खड्डे भरुन रस्ता सुस्थितीत आहे.

(२) सदर ठिकाणी पुलाची सुसाध्यता तपासून काम हाती घेण्यात आले आहे. सद्य:स्थितीत सदर रस्त्यावरील खड्डे भरुन रस्ता सुस्थितीत आहे.

(३) सदर रस्त्यांच्या कामाची करारनाम्यातील तरतुदीनुसार असमाधानकारक प्रगती राखल्याने कंत्राटदारावर दंडात्मक स्वरुपाची कारवाई करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबई शहरास पाणीपुरवठा करणाऱ्या मुख्य जलवाहिन्यांच्या बाजूचे अनधिकृत झोपड्यांचे अतिक्रमण हटविण्याबाबत

**(२५)** * **३४७४ श्री.राजहंस सिंह :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहरास पाणीपुरवठा करणाऱ्या मुख्य जलवाहिनीला ठाण्यात अनधिकृत झोपड्यांचा विळखा पडला असून याकडे ठाणे महानगरपालिका प्रशासनाचे दुर्लक्ष होत असल्याचे माहे एप्रिल, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ठाणे व मुलुंडपर्यंतच्या भागात जलवाहिन्यांच्या बाजूने झोपड्यांचे अतिक्रमण झाले असून एखादी दुर्घटना घडल्यास झोपड्यांना तसेच जलवाहिनीला धोका पोहोचण्याची भीती व्यक्त होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू अतिक्रमण हटविण्याबाबत व जलवाहिन्या सुरक्षित करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे अंशत: खरे आहे.

मुंबई शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या ठाणे शहरातून जाणाऱ्या मुख्य जलवाहिन्यांच्या बाजूला झोपड्या आहेत.

(२) होय, हे खरे आहे.

(३) बृहन्मुंबई महानगरपालिकेडून जलवाहिन्यांच्या दोन्ही बाजूस १० मी. अंतरापर्यंत आढळून आलेल्या झोपड्यांचे निष्कासन करणेबाबत स्थानिक नियोजन प्राधिकरण म्हणून ठाणे महानगरपालिकेस कळविण्यात आले आहे.

ठाणे महानगरपालिका हद्दीत कोलशेत खाडी ते शिवाजीनगर वागळे इस्टेटपर्यंत बृहन्मुंबई महानगरपालिकेला पाणीपुरवठा करणारी पाईप लाईन गेलेली आहे. सदर पाईप लाईनलगतच्या जागेत अतिक्रमणे, अनधिकृत झोपडपट्टया वसलेल्या असून सदरील अतिक्रमणे व झोपडपट्टया ह्या सन २००० पूर्वीच्या असून गृहनिर्माण विभागाकडील शासन निर्णय क्र. झोपुधो-१००१/प्र.क्र.१२५/१४/ झोपसु-१,दिनांक २२ जुलै २०१४ अन्वये संरक्षण पात्र आहेत.

तथापि, सदर परिसरात नजिकच्या काळात झालेल्या व नव्याने होणाऱ्या अतिक्रमणांवर ठाणे महानगरपालिकेकडून वेळोवेळी निष्कासनाची कारवाई करण्यात आलेली आहे. तसेच, नियमितपणे करण्यात येत आहे.

मुंबई महानगर प्रदेश झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, ठाणे यांच्याकडून झोपडपट्टी पुनर्वसन योजनेंतर्गत मौजे माजिवडे व मौजे पाचपाखाडी या भागात तानसा पाईपलाईन लगत असलेली बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या जागेवरील झोपडपट्टी निष्कासित करुन त्यांचे पुनर्वसन करण्याकरीता आवश्यक कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबईतील मरिन ड्राइव्ह ते वरळी सागरी किनारा मार्ग उपाययोजनांअभावी वाहतुकीसाठी खुला करण्यात आल्याबाबत

**(२६) * ३९१४ श्री.सचिन अहिर, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सुधाकर अडबाले :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील मरिन ड्राइव्ह ते वरळी सागरी किनारा मार्गाचे काम पुरेशा उपाययोजना न करताच उद्घाटनाच्या अतिघाईने सुरक्षा चाचण्या न करताच वाहतुकीसाठी खुला करण्यात येऊन सदर मार्गावर अतिवेगाने वाहन चालवणाऱ्यांवर कारवाईसाठी सीसीटीव्ही तसेच सुरक्षेसाठी महाराष्ट्र सुरक्षा बल आणि अग्निशमन केंद्र इत्यादी उपाययोजनांची अद्यापी अंमलबजावणी झालेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कॅगच्या अहवालानुसार कोस्टल रोड प्रकल्पाच्या बांधकामाची गुणवत्ता निकृष्ट दर्जाची असून रुपये ९२२ कोटी एवढ्या रक्कमेची अनावश्यक खर्चवाढ झाली असून वरळी, (मुंबई) येथे पूल डिझायनींगमध्ये नौकानयन स्पॅन ६० मीटरवरुन १२० मीटरपर्यंत वाढवण्याचा निर्णय हा मच्छिमारांच्या आंदोलनामुळे घेण्यात आल्याची बाब सदर अहवालात नमूद करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर सागरी किनारा मार्गावर पुरेशा उपाययोजना नसल्यामुळे वाहनांवरील ताबा जाऊन आतापर्यंत या मार्गावर वाहनांचे नऊ अपघात झाले असून अनेक जण जखमी झाल्याच्या घटना घडल्या असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, हाजी अली दर्गा येथील पादचारी अंडरपास माहे एप्रिल, २०२४ मध्ये उच्च भरतीच्या वेळी पूर्णपणे नियोजनाअभावी पाण्याखाली गेला असल्याची बाब निदर्शनास आली असून कोस्टल रोड प्रकल्पातील अनियमितता आणि निधीचा दुरुपयोग करणाऱ्या संबंधित दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली, वा करण्यात येत आहे,

(५) असल्यास, उक्त मार्गावर तातडीने सीसीटीव्ही तसेच सुरक्षेसाठी महाराष्ट्र सुरक्षा बल व अग्निशमन केंद्र उभारण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली तसेच नियोजनाअभावी हाजी अली दर्गा यासारखे पादचारी अंडरपास पाण्याखाली गेले असून सदर कोस्टल रोड प्रकल्पातील अनिमिततेस जबाबदार असणाऱ्या संबंधित दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.

(२) कॅगच्या अहवालानुसार कोस्टल रोड प्रकल्पाच्या बांधकामाची गुणवत्ता निकृष्ट दर्जाची आहे हे खरे नाही. वरळी, मुंबई येथे पूल डिझायनींमध्ये नौकानयन स्पॅन ६० मीटरवरून १२० मीटरपर्यंत वाढवण्याचा निर्णय हा मच्छिमारांच्या आंदोलनामुळे घेण्यात आल्याची ही बाब खरी आहे.

(३) हे खरे नाही.

मुंबई किनारी मार्गावर सुरक्षाविषयक उपाययोजना जसे सीसीटिव्ही कॅमेरे, पब्लिक ॲड्रेस प्रणाली, इर्मजन्सी कॉल बॉक्स, अग्निशामन यंत्रणा, पोलीस व अग्निशमन दलासाठी बिनतारी संदेशवहन प्रणाली, मोबाईल नेटवर्क पायाभूत सुविधा, वायुवीजन प्रणाली आपत्कालीन व्यवस्थापन कक्षाशी संपर्क यंत्रणा इ. कार्यान्वित करण्यात आलेल्या आहेत.

सदर मार्गावर अतिवेगाने वाहन चालवणाऱ्यावर कारवाईसाठी स्पीड सेन्सींग कॅमेरे बसविण्याचे काम प्रगतिपथावर असून लवकरच कार्यान्वित होतील.

(४) किनारी रस्त्यालगत समुद्रामधील हाजी अली दर्ग्याकडे जाणारा पदपथ भरतीच्यावेळी भाविकांच्या वापरासाठी बंद करण्यात येतो. समुद्रामधील पदपथ प्रकल्पामधील बांधण्यात आलेल्या पादचारी अंडरपासला जोडण्यात आला असल्याने आणि किनारी रस्त्याखालील अंडरपासचे काम सुरू असल्याने भरतीचे पाणी अंडरपासमध्ये आल्याचे माहे एप्रिल २०२४ दरम्यान निदर्शनास आले होते. सद्य:स्थितीत अंडरपासचे उर्वरीत काम पूर्ण झाले असून योग्य त्या उपाययोजना करण्यात आल्याने समुद्राच्या भरतीचे पाणी भुयारी मार्ग / अंडरपासमध्ये येत नाही.

(५) मुंबई किनारी मार्गावर सुरक्षाविषयक उपाययोजना जसे सीसीटिव्ही कॅमेरे, पब्लिक ॲड्रेस प्रणाली, इर्मजन्सी कॉल बॉक्स, अग्निशमन यंत्रणा, पोलीस व अग्निशमन दलासाठी बिनतारी संदेशवहन प्रणाली, मोबाईल नेटवर्क पायाभूत सुविधा, वायुविजन प्रणाली आपत्कालीन व्यवस्थापन कक्षाशी संपर्क यंत्रणा इ. कार्यान्वित करण्यात आलेल्या आहेत.

सदर मार्गावर अतिवेगाने वाहन चालवणाऱ्यांवर योग्य ती कार्यवाही करण्यासाठी वाहतूक पोलीस व परिवहन विभागाकडून इंटरसेप्टर वाहन मार्गाच्या दोन्ही दिशेला तैनात करण्यात आल्या आहेत.

मुंबई किनारी मार्गावर बडोदा पॅलेस येथील जागा अग्निशमन केंद्राकरीता निश्चित करण्यात आली आहे. सध्या सुरक्षेसाठी अग्निशमन दलाकडून एक शीघ्र प्रतिसाद वाहन अमरसन उद्यान परिसरात उभे ठेवण्यात आले आहे. तसेच कंत्राटदारामार्फत एक फायर- टेंडर व मार्शलची व्यवस्थाही करण्यात आलेली आहे.

हाजी अली दर्गा येथील अंडरपासचे काम पूर्ण झाले असून योग्य त्या उपाययोजना करण्यात आल्याने समुद्राच्या भरतीचे पाणी भुयारी मार्ग / अंडरपासमध्ये येत नाही.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## महाराष्ट्र सुरक्षा मंडळाकडून पुरविण्यात येणाऱ्या सुरक्षारक्षकांना पुणे महानगरपालिकेकडून अतिरिक्त दिवसांचे वेतन दिल्याबाबत

**(२७) * ४११८ श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, डॉ.परिणय फुके, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र सुरक्षा मंडळाकडून पुरविण्यात येणाऱ्या सुरक्षारक्षकांना २६ दिवस काम करून ४० दिवसांचा पगार पुणे महानगरपालिकेकडून दिला जात असून रक्षक नेमताना कुठलीही निविदा काढलेली नसून कराराची अनामत रक्कम देखील भरली नसल्याची बाब माहे मे, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, खरे आहे काय,

(२) असल्यास, महिन्यातील २६ दिवस काम करणे अपेक्षित असताना ४० दिवसांची हजेरी लावण्यात येत असल्याने पुणे महानगरपालिकेवर आर्थिक भार येत असून सदर प्रकरणी जबाबदार असणाऱ्या संबंधित दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियानांतर्गत आर्वी (जि.वर्धा) शहराकरीता मंजूर पाणीपुरवठा योजनेचे काम अपूर्णावस्थेत असल्याबाबत

**(२८) * ४५५७ श्री.दादाराव केचे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वर्धा जिल्ह्यातील आर्वी नगरपरिषद महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियानांतर्गत आर्वी शहर वाढीव पाणीपुरवठा योजना मंजूर होऊन त्यास प्रशासकीय मान्यता दिनांक २२ मार्च, २०१८ रोजी प्राप्त झाली असून मंजूर निधी रुपये २२.४३ कोटी व त्याचे प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, वर्धा यांच्याकडे देण्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान अंतर्गत वर्धा जिल्ह्यातील आर्वी शहरात मलनिस्सारण योजना मंजूर असून त्याची प्रशासकीय मान्यता दिनांक २७ फेब्रुवारी २०१९ रोजी मिळाली असून कामाचा मंजूर निधी रुपये ४७.४३ कोटी आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, योजनेच्या प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, वर्धा व कंत्राटदार मे. संतोष कंट्रक्शन ॲण्ड इन्फ्रा प्रायव्हेट लिमिटेड, नांदेड या कंपनीला सदरहू काम मिळाले असून कामाचा कालावधी १८ महिने असतानाही काम अपूर्णावस्थेत आहेत, हे ही खरे आहे काय?
(४) असल्यास, दररोज शहरात अपघात होत असून सर्वच ठिकाणी अर्धवट पाईप टाकल्यामुळे व वरून काँक्रिटीकरण न केल्यामुळे लहान लहान मुले त्या खोदलेल्या खड्ड्यामध्ये पडतात व लहान लहान जनावरे पडतात त्यामुळे या योजनेपासून जनता त्रस्त आहे, हे ही खरे आहे काय?
(५) असल्यास, योजनेच्या कामांची बिले कंत्राटदाराला काम न करताही दिली जात असल्याने नागरिकांमध्ये असंतोषाची भावना निर्माण झाली असून उक्त प्रकरणी चौकशी करुन चौकशीनुसार योजनेचे काम पूर्ण न करता बिले काढणाऱ्या अधिकाऱ्यांवर व संबंधित कंत्राटदारावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियानांतर्गत आर्वी शहराच्या पाणीपुरवठा व मलनिःस्सारण प्रकल्पास प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्यात आलेली असून पाणीपुरवठा प्रकल्पाची भौतिक प्रगती ८० % आहे व मलनिःस्सारण प्रकल्पाची भौतिक प्रगती ७३ % असून सद्य:स्थितीस दोन्ही प्रकल्पांची कामे

प्रगतीपथावर आहेत. सदर दोन्ही प्रकल्पांची कामे पूर्ण होण्यास जलशुद्धीकरण केंद्र / मलशुद्धीकरण केंद्राच्या जागेबद्दल स्थानिक नागरिकांचा विरोध, कोव्हीड-१९ महामारी, राष्ट्रीय महामार्गाच्या जागेतून पाईप लाईन टाकण्यास मंजूरी मिळण्यास विलंब व कंत्राटदाराची कामाची संथगती इ. विविध कारणांमुळे विलंब झालेला असून ठेकेदाराकडून झालेल्या विलंबासाठी पाणीपुरवठा प्रकल्पाच्या कामात दंड लावण्यात आलेला आहे. तसेच, मलनिःस्सारण प्रकल्पाच्या कामासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून दंड प्रस्तावित आहे.

(४) आर्वी शहराच्या पाणीपुरवठा प्रकल्पात अशुध्द पाण्याची ऊर्ध्ववाहिनी, गुरुत्ववाहिनी व वितरणवाहिनीचे काम तसेच, मलनिःस्सारण प्रकल्पात मलवाहिनीचे कामे समाविष्ट असून सदर कामांच्या अनुषंगाने आवश्यकतेनुसार खोदकाम करण्यात आलेले आहे तसेच, सदरील खोदकाम वेळोवेळी बुजविण्यात आलेले असून खोदकाम करताना बॅरिकेट्स वापरणे अशा प्रकारच्या आवश्यक त्या उपाययोजना महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून करण्यात येत आहेत.

(५) व (६) महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियानांतर्गत आर्वी शहरात प्रगतीपथावर असलेल्या प्रकल्पातील कामांची देयके कामांची मोजमाप घेऊन, कामांची मोजमाप पुस्तिकेमध्ये नोंद घेऊन व विहित पध्दतीने तपासणी करून अदा करण्यात येत असून कोणत्याही कामाची देयके कंत्राटदाराला काम न करता अदा करण्यात आली नसल्याचे सदर प्रकल्पाची कार्यान्वयन यंत्रणा असलेल्या महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने कळविले आहे.

-----------------

## पंतप्रधान आवास योजनेंतर्गत म्हाडाने कोकण मंडळात बांधलेल्या घरांची विक्री होत नसल्याबाबत

**(२९)** * **४३३० श्रीमती चित्रा वाघ :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पंतप्रधान आवास योजनेंतर्गत (पीएम) सर्वसामान्यांचे घराचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी म्हाडाने कोकण मंडळात सुमारे ९ हजार अधिक घरे बांधली असून सदर घरे गत ४ ते ५ वर्षापासून विक्रीविना पडून असल्याची बाब माहे मार्च, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या घरांच्या विक्रीकरीता म्हाडाने मोठी मोहीम राबविली जात असून अनामत रक्कम भरलेल्या ३२५० घरांपैकी ६५० जणांनी ह्या घरांचे बांधकाम निकृष्ट दर्जाचे असल्यामुळे घरे नाकारुन अर्ज मागे घेतले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, म्हाडाच्या घरांचे ठिकाण व किंमतीमुळे ग्राहकांमध्ये निर्माण झालेला संभ्रम दुर करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे आहे.

(२) प्रधानमंत्री आवास योजनेच्या (शहरी) पात्रतेत न बसणे, घरांची किंमत भरता न येणे, कर्ज न मिळणे इत्यादी कारणांमुळे अर्ज मागे घेण्यात आले आहेत.

(३) व (४) प्रधानमंत्री आवास योजने (शहरी) अंतर्गत घरे विक्रीसाठी प्रचार व प्रसिध्दीची मोहिम राबविण्यात येत आहे. "प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य" या तत्वावर घरांची विक्री करण्यात येत आहे. बुक

माय होम पोर्टलवर अर्जदारास घरांची निवड स्वत: करण्याची संधी देण्यात आली आहे. घरे विक्रीसाठी एजन्सीची नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच सदनिकांची किंमती कमी करण्यात आल्या आहेत.

-----------------

## सटाणा (जि.नाशिक) शहराच्या मध्यभागातून जाणाऱ्या पिंपळनेर- शिर्डी राष्ट्रीय महामार्गावरील वाहतूक कोंडीबाबत

**(३०) * ४४८० श्री.सत्यजीत तांबे :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र-गुजरात राज्यांना जोडणारा पिंपळनेर- शिर्डी राष्ट्रीय महामार्ग सटाणा (जि.नाशिक) या प्रमुख शहराच्या मध्यभागातून जात असून सततच्या वाहतुकीमुळे शहरात वाहतूक कोंडी होत असल्याने अनेक दिवसांपासून सटाणा बाह्यवळण रस्ता करण्याची मागणी सातत्याने होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शहरातील या वाहतूक कोंडीमुळे नागरिकांना आणि वाहनचालकांना मोठ्या प्रमाणात त्रास होणे, त्यांच्या वेळेचा अपव्यय होणे, तसेच या वाहतूक कोंडीमुळे शहरातील अंतर्गत रस्त्यांवरही ताण येत असून, त्याचा परिणाम म्हणून लहान-मोठे अपघात होण्याची शक्यता वाढली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सटाणा शहर बाह्यवळण रस्ता करण्यासाठी यापूर्वी अनेकदा सर्वेक्षण होऊनही सदर रस्त्याचे काम अद्यापही प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सिन्नरसह इतर शहरांमध्ये अशीच परिस्थिती असून सटाणा शहराला भेडसावणाऱ्या वाहतूक कोंडीची कारणे शोधून, सटाणा बाह्यवळण रस्ता लवकरात लवकर पूर्ण करण्यासाठी कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे अंशत: खरे आहे.

सटाणा या शहरातील सदर महामार्गाच्या लांबीचे दर्जोन्नती व सुधारणाचे काम (४ मार्गिकेत) प्रगतीत आहे. सदरचे काम पूर्ण झाल्यानंतर वाहतूक कोंडी कमी होण्यास मदत होणार आहे.

(३) व (४) हे खरे नाही.

राष्ट्रीय महामार्ग विभागाकडून सदर बाहयवळण रस्त्याचे सर्वेक्षण करण्यासाठी व तपशीलवार अहवाल (DPR) करण्यासाठी सल्लागार नियुक्तीकरीता निविदा प्रक्रिया प्रगतीत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## शिवशाही पुनर्वसन प्रकल्प कंपनीचे कोट्यवधी रुपये विकासकांनी थकित ठेवल्याबाबत

**(३१) * ३१८६ श्री.श्रीकांत भारतीय, श्री.प्रसाद लाड, श्री.प्रविण दरेकर, श्रीमती उमा खापरे, श्रीमती चित्रा वाघ, ॲड.निरंजन डावखरे, श्री.संजय केणेकर, श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्प जलदगतीने पूर्ण व्हावेत याकरीता विकासकांना अर्थसहाय्य करण्याच्या हेतूने स्थापन करण्यात आलेला शिवशाही पुनर्वसन प्रकल्प कंपनीच्या मुंबई शहरातील पाच मोठ्या

विकासकांनी शिवशाही पुनर्वसन प्रकल्पांतर्गंत भाडेतत्त्वावर घेतलेल्या संक्रमण शिबिरांची रुपये ११६ कोटीची थकबाकी जमा केली नसल्याची बाब माहे मे, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शिवशाही पुनर्वसन प्रकल्पाने एकूण ६६७ घरे ५ विकासकांना भाडेतत्त्वावर दिली असून, त्यापैकी एका घरासाठी दरमहा रुपये ७,००० भाडे व रुपये ४०,००० आगाऊ रक्कम आकारली जाते, तरीही विकासकांकडून शासनाने भाडे वसुल केलेले नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, संबंधित विकासकांशी अधिकाऱ्यांचे आर्थिक हितसंबंध असल्यामुळे भाडे थकविण्यात आले असतानाही शिवशाही पुनर्वसन प्रकल्पाच्या अधिकाऱ्यांकडून विकासकास केवळ नोटीस पाठविण्याशिवाय इतर कोणतीच कारवाई करण्यात आली नसून थकबाकी वसुल करण्याकरीता विकासकांकडून कोणताही प्रतिसाद मिळत नसून या कंपनीकडून अतिरिक्त व्याज आकारण्यात आल्याचा दावा विकासकांकडून करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, शिवशाही पुनर्वसन कंपनीची थकबाकी वसुल करण्याबाबत तसेच थकीत रक्कम अदा करण्यास जाणीवपूर्वक दिरंगाई करणाऱ्या संबंधित ५ विकासकांवर तसेच त्यांच्या थकबाकीबाबत दुर्लक्ष करणारे शिवशाही प्रकल्पातील अधिकारी यांच्यावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे आहे.
(२) शिवशाही पुनर्वसन प्रकल्प मर्यादित कंपनीमार्फत ७ मजले असणाऱ्या इमारतीतील कायमस्वरुपी संक्रमण सदनिकांसाठी (PTC- Permanent Transit Camp) प्रतिमहा प्रति सदनिका रुपये ७,०००/- व ७ पेक्षा जास्त मजले असलेल्या इमारतीतील सदनिकांसाठी (PTC) प्रतिमहा प्रति सदनिका रुपये ८,०००/- इतके भाडे व रुपये ४०,०००/- इतकी बिनव्याजी अनामत रक्कम घेण्यात येते. ५ खाजगी विकासकांना ६६७ घरे भाडेतत्वावर वितरीत करण्यात आली असून त्यांच्याकडील थकीत रक्कम वसूल करण्यासाठी शिवशाही पुनर्वसन प्रकल्प मर्यादित कडून प्रयत्न करण्यात येत आहेत.
(३) व (४) खाजगी विकासकांकडील थकीत रक्कम वसुल करण्यासाठी शिवशाही पुनर्वसन प्रकल्प मर्यादित कडून विकासकांना थकीत रक्कमेबाबत लेखी पत्र, नोटीसद्वारे पाठपुरावा करण्यात येतो. झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविणाऱ्या सहकारी गृहसंस्थेस विकासकांकडील थकीत रक्कमेबाबत लेखी सूचीत करून थकीत रक्कम कंपनीस अदा करणेसाठी विकासकाकडे पाठपुरावा करणेबाबतही कळविण्यात येते. तसेच विकासकांच्या बैठका व सुनावणी आयोजित करण्यात आल्या आहेत. संबंधित विकासकाच्या विक्री घटकांच्या इमारतीच्या बांधकामाच्या परवानग्या स्थगित (Stop Work) ठेवण्यासाठी तसेच महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६७ मधील तरतुदीनुसार जमीन महसूल वसुली प्रमाणपत्र (RRC) कार्यवाही करण्याबाबत झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणास कळविण्यात आले आहे.

याबाबत शासनस्तरावर बैठक आयोजित करून सदर थकबाकी वसूल करण्याबाबत झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण तसेच शिवशाही पुनर्वसन प्रकल्प मर्यादित यांना निर्देशित करण्यात आले आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## ठाणे शहरात (जि.ठाणे) क्लस्टर योजना राबविण्यास नागरीकांचा विरोध असल्याबाबत

**(३२) * २८६४ ॲड.अनिल परब :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे शहरात (जि.ठाणे) क्लस्टर योजना राबविण्यास तेथील नागरीकांचा विरोध असतानाही नागरीकांच्या घरांवर अनुमती न घेता नोंदणी क्रमांक टाकण्यात आल्यामुळे स्थानिक रहिवाशांनी तेथील लोकप्रतिनिधींसह दिनांक २७ एप्रिल, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शने केली आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या योजनेंतर्गत घरांवर क्रमांक टाकल्याने नागरीकांमध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण झाली असून नागरिक या योजनेला विरोध करत असून या योजनेमुळे नागरीकांच्या मालमत्तेवर कोणताही अधिकार राहणार नाही, अशी भीती त्यांना वाटत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, ठाणे शहरात क्लस्टर योजना लागू केल्यामुळे प्रलंबित एसआरए योजनेच्या प्रकल्पांना गती मिळण्याची शक्यता असून क्लस्टर योजना राबविण्यास नागरिकांनी विरोध दर्शवला असून विकासकांच्या फायद्यासाठी ही योजना राबविण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, क्लस्टर योजनेंतर्गत इमारतींचे सर्वेक्षण करण्यासाठी बायोमेट्रिक प्रक्रिया राबविण्यात येत असून सदर प्रक्रियेत आपली माहिती सुरक्षित राहील की नाही ही भिती व्यक्त करत नागरीकांनी सदर बायोमेट्रीक सर्वेक्षण बंद करण्याची मागणी ठाणे महानगरपालिकेकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, महानगरपालिका क्षेत्रातील मूलभूत सुविधांचा अभाव असलेल्या भागाचा तसेच धोकादायक व जुन्या इमारतींचा पुनर्विकास करण्यासाठी अशा क्षेत्रात नागरी पुनरुत्थान योजनेची (क्लस्टर) प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) अशी बाब निदर्शनास आलेली नाही.
(२) हे खरे नाही. नागरी पुनरुत्थान आराखडा क्र.२० मानपाडा-१ (मनोरमानगर) येथील क्षेत्राचे बायोमेट्रिक सर्वेक्षण करताना सदर क्षेत्रामधील नागरीकांकडून उपस्थित करण्यात आलेल्या तोंडी शंकाच्या अनुषंगाने सदर क्षेत्रामधील नागरीक व लोकप्रतिनिधी यांच्यासमवेत विविध शासकीय बैठका घेऊन नागरी पुररुत्थान योजनेबाबत परिपूर्ण माहिती देवून त्यांच्या शंकेचे निराकरण करण्यात आले आहे.
वरील बाबींमुळे नागरीकांमध्ये नागरी पुनरुत्थान योजनेबाबत सकारात्मक दृष्टीकोन निर्माण झाला असून, सद्य:स्थितीत सदर क्षेत्रामंध्ये बायोमेट्रिक सर्वेक्षण सुरळीतपणे सुरु आहे.
(३) हे खरे नसून, सदरची योजना ही सार्वजनिक जनहितार्थ प्रयोजनाकरीता राबविण्यात येत आहे.
(४) क्लस्टर योजनेंतर्गत इमारतीचे CIMS सर्वेक्षण करुन सदरची माहिती ही ठाणे महानगरपालिकेच्या क्लस्टर विभागाकडील सर्व्हर (Sever) मध्ये संकलित केली जात असून, सदर माहिती पूर्णता सुरक्षित आहे.
(५) सदर योजनेची प्रभाविपणे अंमलबजावणी करणेच्या अनुषंगाने URP क्षेत्राचे CIMS सर्वेक्षण, सामाजिक, आर्थिक, परीमाण आकलन आणि योजनेचे नागरीकांसाठी माहिती, शिक्षण आणि संप्रेषणची कामे करण्यात येते.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## बृहन्मुंबई महानगरपालिकेचा मालमत्ता कर न भरणाऱ्या कंपन्यांवर कारवाई करण्याबाबत

**(३३) * ३३३१ श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील मोबाईल टॉवरच्या माध्यमातून नेटवर्क पुरविणाऱ्या ११ दुरसंचार कंपन्यांनी बृहन्मुंबई महानगरपालिकेचा रुपये ९३ कोटी ८६ लाखांचा मालमत्ता कर थकविण्यात आला असल्याची बाब माहे मार्च, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मोबाईल कंपन्यांमध्ये २१ फर्स्ट सेंचुरी इन्फर्टेल लि. कंपनीचा रुपये ७५ लाख, मे.एटीसी टॉवर कॉर्पोरेशन प्रा.लि. कंपनीचा रुपये ८३ लाख, मे.भारत सेल्युलर लि. कंपनीचा ८ कोटी ९६ लाख, मे.बीपीएल मोबाइल कम्युनिकेशन कंपनीचा रुपये ३ कोटी ३७ लाख, मे. आयडिया सेल्युलर लि. कंपनीचा रुपये ३ कोटी ३७ लाख, मे.इंडस टॉवर्स लि.कंपनीचा रुपये ३५ कोटी ६९ लाख, मे.महानगर टेलिफोन निगम लि.कंपनीचा ५ कोटी १२ लाख, मे रिलायन्स इन्फोकॉम लि. कंपनीचा ११ कोटी ९८ लाख, मे.टाटा टेली सर्व्हिस (महाराष्ट्र) लि.कंपनीचा रुपये ३ कोटी २४ लाख, मे.व्होडाफोन एस्सार लि. कंपनीचा रुपये ३ कोटी १५ लाख व अन्य कंपनीचा रुपये १७ कोटी ५ लाखाचा मालमत्ता कर थकविण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन बृहन्मुंबई महानगरपालिकेचा मालमत्ता कर न भरणाऱ्या कंपन्यांच्या मोबाईल टॉवरवर कारवाई करुन सदर कंपन्यांना बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रामध्ये मोबाईल टॉवर्स उभारण्यासाठी देण्यात आलेल्या सर्व परवानग्या रद्द करण्याबाबत तसेच मालमत्ता कर वसूल करण्याबाबत कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

यापैकी मे.बीपीएल मोबाइल कम्युनिकेशन कंपनीचा रुपये ३ कोटी ७४ लाख मालमत्ता कर थकित आहे.

(३) मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ कलम २०२ अन्वये थकीत मालमत्ता करावर दरमहा २% दराने दंड आकारण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या शिवडी येथील टीबी रुग्णालयात इंटेसिव्हिस्ट डॉक्टर्स उपलब्ध करुन देण्याबाबत

**(३४) * ३९१८ श्री.सचिन अहिर :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या शिवडी येथील टीबी रुग्णालयात रुग्णांवर उपचार करण्यासाठी इंटेसिव्हिस्ट डॉक्टर्स उपलब्ध होत नसल्यामुळे रुग्णांना वेळेवर उपचार मिळण्यात अडचणी येत असल्याची बाब माहे मे, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या (BMC) शिवडी येथील क्षयरोग (TB) रुग्णालयात अतिदक्षता विभागातील (Intensivist) डॉक्टरांच्या कमतरतेमुळे रुग्णालयात पुरेसे डॉक्टर मिळत

नसल्यामुळे, प्रशासनाला वारंवार जाहिराती काढाव्या लागत असूनही सदर पदांकरीता डॉक्टर उपलब्ध होऊ शकले नाहीत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, डॉक्टरांची कमतरता आणि अतिदक्षता विभाग महत्वाचा असूनही, डॉक्टरांचा प्रतिसाद मिळत नसल्यामुळे सदर परिस्थिती निर्माण झाली असून बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या शिवडी येथील टीबी रुग्णालयात रुग्णांवर उपचार करण्यासाठी सद्य:स्थितीत एकच इंटेसिव्हिस्ट कार्यरत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या समस्येचे निराकरण करण्यासाठी प्रशासनाने तात्काळ उपाययोजना करणे आवश्यक असून जेणेकरून रुग्णांना योग्य उपचार मिळू शकतील तरी तात्काळ डॉक्टर उपलब्ध होण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.
(२), (३) व (४) शिवडी येथील क्षयरोग (TB) रुग्णालयामध्ये अतिदक्षता विभागासाठी दिनांक २७ मार्च, २०२४ रोजी इंटेसिव्हिस्ट डॉक्टरांची ४ कंत्राटी पदे मंजूर करण्यात आली होती. सदर पदे भरण्यासाठी शिवडी क्षयरोग रुग्णालयामार्फत ४ वेळा जाहिरात प्रसिध्द करण्यात आली. या जाहिरातीनुसार ३ पदे भरण्यात आली आहेत. शिवडी क्षयरोग (TB) रुग्णालयातील अतिदक्षता विभाग पूर्ण क्षमतेने सुरू झाल्यानंतर उर्वरित १ पद प्रतिक्षायादीतून भरण्याचे नियोजित आहे.

तसेच, अतिदक्षता कक्षातील रुग्णसेवेवर परिणाम होऊ नये यासाठी रुग्णालयातील १ भुलरोग तज्ञ व ५ छातीविकार तज्ञ यांच्यादेखील सेवा घेण्यात येतात.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## आर्वी (जि.वर्धा) शहरासाठीच्या जलशुद्धीकरण केंद्राचे काम अपूर्णावस्थेत असल्याबाबत

**(३५)** * **४५५८ श्री.दादाराव केचे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वर्धा जिल्ह्यातील आर्वी शहरासाठी जलशुद्धीकरण केंद्राकरीता रुपये ११ कोटी ८ हजार २५१ एवढी रक्कम मंजूर असून त्यांचा कार्यारंभ आदेश दिनांक ०१ जुलै, २०१९ व काम पूर्ण करण्याचा कालावधी १८ महिन्याचा असल्याची बाब माहे मे, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, आर्वी (जि.वर्धा) शहरांमध्ये शुध्द पाणीपुरवठा होत नसून या योजनेचे काम मे.गणेश ॲड गणेश असोसिएट, नागपूर यांनी घेतले असून जलशुद्धीकरणाचे काम अद्यापही अपूर्ण असल्यामुळे तेथील नागरिकांच्या जिवितास धोका निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू योजनेचे काम नियोजित वेळेत पूर्ण न होण्याची कारणे काय आहेत, तसेच सदरहू कामाच्या विलंबामुळे सदर प्रकरणी दोषी असलेल्या कंत्राटदार कंपनीवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) व (२) महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियानांतर्गत आर्वी शहराच्या रुपये २२.४३ कोटी किंमतीच्या पाणीपुरवठा प्रकल्पास दिनांक २२ मार्च, २०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्यात आलेली आहे. सदर प्रकल्पाची कार्यान्वयन यंत्रणा ही महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत आहे. त्यांच्यामार्फत सदर प्रकल्पातील स्थापत्य कामाची निविदा प्रक्रिया राबवून मे. संतोष कन्स्ट्रक्शन ॲण्ड इन्फ्रा प्रा. लि. यांना दिनांक ०१ जुलै, २०१९ रोजी कार्यादेश देण्यात आले.

प्रस्तुत प्रकल्पातील जलशुद्धीकरण केंद्राच्या जागेबद्दल स्थानिक नागरिकांच्या विरोधामुळे व सदर जागेबाबत मा.उच्च न्यायालयात अपील दाखल केल्यामुळे नगरपरिषदेस जलशुद्धीकरण केंद्राची जागा उपलब्ध करून देण्यास विलंब झाला, त्यामुळे कंत्राटदाराने जुन्या दराने जलशुद्धीकरण केंद्राचे काम करण्यास नकार दिला व त्यामुळे जलशुद्धीकरण केंद्राच्या समावेशासह यांत्रिकी कामाची रुपये ४.६८ कोटी किंमतीची स्वतंत्र निविदा राबवून सदरील कामाचे कार्यादेश मे. गणेश ॲण्ड असोसिएट, नागपूर यांना दिनांक ०५ जुलै, २०२४ रोजी देण्यात आल्याचे नगरपरिषदद्वारे कळविले असून आजमितीस जलशुद्धीकरण केंद्राच्या कामाची ४० % भौतिक प्रगती झाली असून उर्वरित काम प्रगतीपथावर आहे. तसेच, प्रकल्पाची एकूण भौतिक प्रगती ८० % झालेली आहे.

आर्वी शहरास अस्तित्वातील ७.५० दलघमी क्षमतेच्या जलशुद्धीकरण केंद्राद्वारे सारंगपुरी तलाव व वर्धा नदी द्वारे शहरास नियमित पाणीपुरवठा सुरू आहे. शहरातील नागरिकांच्या जिवीतास कुठलाही धोका निर्माण झालेला नसल्याचे नगरपरिषदेने कळविले आहे.

(३) व (४) महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियानांतर्गत आर्वी शहराच्या पाणीपुरवठा प्रकल्पाचे काम जलशुद्धीकरण केंद्राच्या जागेबद्दल स्थानिक नागरिकांचा विरोध, कोव्हीड-१९ महामारी, राष्ट्रीय महामार्गाच्या जागेतून पाईप लाईन टाकण्यास मंजूरी मिळण्यास विलंब व कंत्राटदाराची कामाची संथ गती इ. कारणांमुळे विलंब झाला असून कंत्राटदाराच्या संथ गतीमुळे दिनांक ०१ ऑक्टोबर, २०१९ पासून दिनांक २९,५९०/- प्रतिदिन दंड आकारण्यात आलेला असून आजमितीस रुपये १० लक्ष दंड वसूल करण्यात आलेला आहे. तसेच, प्रकल्पाचे काम ३१ डिसेंबर, २०२५ पर्यंत पूर्ण करण्याचे सदर प्रकल्पाची कार्यान्वयन यंत्रणा असलेल्या महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे नियोजन आहे.

-----------------

## नाशिक महानगरपालिका हद्दीतील बांधकामास ‘फनेल झोन’मुळे परवानगी नाकारल्याबाबत

**(३६)** * **४४८१ श्री.सत्यजीत तांबे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंदुस्तान एरोनोटिक्स लिमिटेड कंपनीने नाशिक शहरात ‘फनेल झोन’मध्ये सुमारे २० किलोमीटर परिसरात बांधकाम परवानगी न देण्याबाबत नाशिक महानगरपालिकेस कळविले असून शहरातील बांधकाम क्षेत्रात समस्या उद्भवली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या बांधकाम बंदीमुळे सुमारे २५ हजार कोटी रुपयांचे बांधकाम प्रकल्प प्रलंबित असून बांधकाम व्यावसायिक आणि नागरिकांना अनेक समस्यांचा सामना करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ६० दिवसांत बांधकाम परवाना देण्याची कालमर्यादा या बंदीमुळे बंद होण्याची शक्यता आहे तसेच अनेक बांधकाम परवान्याबाबत हिंदुस्तान एरोनोटिक्स लिमिटेड कंपनीचे अभिप्राय घ्यायचे

झाल्यास मोठा कालापव्यय होण्याची शक्यता आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, ‘एचएएल फनेल झोन’मुळे निर्माण झालेल्या या बांधकाम बंदीवर तोडगा काढून आणि बांधकाम क्षेत्राला चालना देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) तहसिलदार (महसूल) जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक यांनी दिनांक २४/०४/२०२५ रोजीच्या पत्रान्वये, एचएएल विमानतळाच्या आजुबाजुच्या २०.०० कि.मी. परिसरात असलेल्या इमारतीच्या बांधकामाबाबत हिंदुस्थान एरोनॉटिक्स लि. ओझर टाऊनशिप, नाशिक यांचे अभिप्राय घेतलेनंतरच परवानगी देणेबाबत कार्यवाही करणेत यावी, असे नाशिक महानगरपालिकेस कळविले आहे.
(२), (३), (४) व (५) उपरोक्त नमूद दिनांक २४/०४/२०२५ रोजीचे पत्र प्राप्त झालेनंतर या अनुषंगाने दिनांक ०५/०५/२०२५ रोजीच्या पत्रान्वये नाशिक महानगरपालिकेने महाव्यवस्थापक, वायुमान मरम्मत प्रभाग, नाशिक एचएएल ओझर टाऊनशिप यांना “सदर २० कि.मी. परिसरात नाशिक महानगरपालिकेचे साधारणतः ८०% क्षेत्र येते असून या परिसरात यापुर्वीच त्या त्या वेळी लागु नियमाप्रमाणे मोठ्या प्रमाणात विकास परवानग्या देण्यात आलेल्या आहेत. त्याप्रमाणे जागेवर विकास झालेला आहे. एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीमधील तरतुदीप्रमाणे ६० दिवसांचे आत अंतिम मंजुरी देणे बंधनकारक आहे. सदर कालमर्यादा विचारात घेता, वरील बाबींमुळे कालपव्यय होवून अडचण निर्माण होण्याची शक्यता आहे. त्यामुळे सद्य:स्थितीत अस्तित्वातील विमानतळ/धावपट्टी यांपासून अंतरनिहाय इमारत उंचीची मर्यादा दर्शविणारा नकाशा (फनेल झोन नकाशा) महानगरपालिकेस पुरविल्यास त्याचा अभ्यास करुन धोरण निश्चित करता येईल” असे कळविले आहे.

तद्नंतर नाशिक महानगरपालिकेने जिल्हाधिकारी यांना दिनांक २६/०६/२०२५ रोजीच्या पत्रान्वये सदर प्रकरणी संयुक्त बैठकीचे आयोजन करणेस विनंती केली आहे.

नाशिक महानगरपालिका क्षेत्रातील विकास परवानग्यांचा ओघ व अधिनियमातील तरतुदीप्रमाणे विहीत मुदतीत परवानगी देण्याचे बंधन याबाबी विचारात घेवून सद्य:स्थितीत विकास परवानगी देण्याची कार्यवाही अस्तित्वातील नियमावलीप्रमाणे सुरू आहे.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ.विलास आठवले**
**सचिव-३,**
**महाराष्ट्र विधानपरिषद**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.